
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क



''मेरी झाँसी नहीं दूँगी''

• पुणे • वर्ष १५ वे • अंक १ ला • एप्रिल - जून २०११ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!





पितांबरी®
फार्म्स अँन्ड अँग्रो टूरिजम
कोकणातली शांती आणि सौंदर्य अनुभवा!
कोकणात एक नवं आकर्षण,
पितांबरी अँग्रो टूरिझम!
यात काय पहाल ?
• दापोली परिसरातले एकमात्र आयुर्वेद उद्यान.
• विविध सुगंधी फुले आणि गवताची लागवड.
• पितांबरी 'देवभक्ती अगरबत्ती' कारखाना पाहण्याची संधी.
• बैलगाडीतून रपेट.
• दापोलीत प्रशस्त बंगल्यात राहण्याची व स्वादिष्ट जेवणाची सोय.
हे आणि बरंच काही...
त्वरा करा... नोंदणीसाठी आजच संपर्क करा.
९८३३००७०६४, ९८६९६९९५५९
Pitambari Products Pvt. Ltd. : Thane: 022-67035555, Pune: 020-25390734, CIN: U24239MH1989PTC051314

| शहर : | सभासदाचे नाव व क्र.: | वर्गणी कालावधी |
|---|---|---|

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)



वर्ष १५ वे | एप्रिल-जून २०१९ | अंक १ ला

अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर मोबा. : ९८१९८८५६६५

सचिव : श्री. गणेश गुर्जर मोबा. : ९८९०९९०११३

कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर मोबा. : ९८२०४ १७९८१

संस्था नोंदणी क्र. महा-१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र एफ४६५२३ पी दि. ३/३/२०१६

## संपादक मंडळ

संपादक : श्री. हेमंत पुराणिक, ९९२३८ १०१९४

तंत्रज्ञ : श्री. सचिन ताटके, ९८६७१ ९२३१०

सल्लागार : श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली-सदस्य ९८३३१६३६५९

सदस्य : सौ. मेघा नाटेकर, ९६३७१५५९४८

श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, ९४०३७ ०२७३४

प्रकाशक : श्री. गणेश गुर्जर, ८१४९९ ०७७८९

## जाहिरातीचे दर

| पान | एक वेळ | चार वेळा |
|---|---|---|
| पाव | रु. ५००/- | रु. २०००/- |
| अर्धा | रु. १०००/- | रु. ४०००/- |
| पूर्ण | रु. २०००/- | रु. ८०००/- |
| शुभेच्छा | रु. ५००/- | रु. २०००/- |
| पूर्ण पान रंगीत | रु. ३०००/- | रु. १२०००/- |
| पृष्ठदान | रु. २००/- | - |

नियतकालिकाचे नाव : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'

पत्ता : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,

द्वारा : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०

संपादक : श्री. हेमंत पुराणिक

मुद्रक : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि

१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

ऑफिस संपर्क : ०२०-२४४३२४४३ / मो. ८१४९९०७७८९

email : bkbmsindia@gmail.com

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

**शहर प्रतिनिधी-**

श्री. प्रसाद पंडित, मुंबई, ९८६९१ ५५२१५

श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९० ५१६५३

श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली, ९८३३१ ६३६५९

श्री. मनीष नवाथे, नागपूर ९८५०३ ३१४६० *

सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९ ७३६७९

श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा, ९०११० ६३०३०

श्री. दिलीप ढवळे, रत्नागिरी, ९४२२५ ४९०८५

श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८ ०५८०७

श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९० ३७३४१

श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९४२८२३३१८८

श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, पुणे, ९४०३७ ०२७३४

श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९ ९५८९२

श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७ ९९६९७

श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८ ८०१३८

श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२ ०५६९०

सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१ ४८७७५

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की, आपली वार्षिक वर्गणी आता रु. ३००/-, रु. ५००/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षांसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी (पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे-३० च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे). शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक 05521011004008 असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयांतच पाठवावा. कृपया मनिऑर्डर पाठवू नये.

संपर्क

# अनुक्रमणिका


- संपादकीय ३
- साल्हेर - आदित्य पाध्ये ४
- For Vidarbha Star Aditya Sarwate, Life Hasn't Always Been Easy - Sachin Tatake ६
- परदेशी प्रवासात अनुभवलेली माणुसकी - श्रीहरी गुणे ७
- प्रवासवर्णन - इंदूर, उज्जैन, मांडू - उषा बा. कशेळकर ८
- Who will look after your business? After You?- Suhas Harshe ९
- ओघळणारे पाणी - विवेक नारळकर १०
- टेक्नॉलॉजी - केदार पाध्ये ११
- नीरा नृसिंहपूर - सौ. अंजली माईणकर १३
- गेट-टू-गेदर कशासाठी? - सौ. शुभदा गुर्जर १४
- साले, शिरा, बियासुद्धा खा! (प्रक्रिया करुन) - श्रीहरी गुणे १५
- यज्ञोपवित - श्रीरंग हिर्लेकर १६
- पदर -लीला भागवत १८
- संस्थावृत्त-
  - सिंधुदुर्ग जिल्हा ब्राह्मण संघ १९
  - कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली, जि. ठाणे. १९
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई २०
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा २१
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सांगली २१
  - कऱ्हाडा युथ क्लब आणि कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली २२
  - कऱ्हाडे ब्राम्हण सेवा मंडळ डोंबिवली : महिला समिती व डोंबिवली पश्चिम कार्यकारिणी २२
  - कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली २३
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड २३
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक संक्रांत संमेलन २०१९- वृत्तांत २४
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सोलापूर- गौरवदिन २५
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे २५
  - विदर्भ संस्थेचीच अमरावती शाखा २६
  - रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघ मर्यादित, रत्नागिरी वसतिगृहात कॅरम खोलीचे उद्घाटन २७
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदा २८
  - एक दिवसाची सहलः कांवी कंबोई, स्थंभेश्वर महादेव २८
  - रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघ मर्यादित, रत्नागिरी संघातर्फे ह्द्य सत्कार २८
  - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ २९
- असंही होऊ शकतं? - श्री. श्रीरंग हिर्लेकर ३०
- यशोगाथा : श्री. विवेक नानिवडेकर - शब्दांकन सौ. मेघा नाटेकर ३२
- मूली खाने से होने वाले फायदे - श्री. श्रीकृष्ण आंबेकर ३३
- मला उमजलेले संरक्षणमंत्री -डॉ. योगेश गुर्जर ३४
- एक तपस्वी श्री. अनंत दत्तात्रेय कात्रे ३५



संपादक मंडळ

हेमंत पुराणिक
संपादक
मो. ९९२३८ १०१९४

गोपाळ भाटवडेकर
उपसंपादक
मो. ९८५०९ ७९७०६३

गणेश गुर्जर
प्रकाशक
मो. ९८९०९९०११३

सचिन ताटके
तंत्रज्ञ सदस्य
मो. ९८६७१ ९२३१०

सौ. मेघा नाटेकर
सदस्य
मो. ९६३७१ ५५९४८

ऋषिकेश पळसुलेदेसाई
सदस्य
मो. ९४०३७ ०२७३४

प्रदीप हळबे
सल्लागार
मो. ९८३३१ ६३६५९

अविनाश मणेरीकर
सदस्य
मो. ९४२२३ ७९८७८


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

– संपादक

# संपादकीय



नमस्कार!

सर्वप्रथम संपर्कच्या सर्व सभासदांना व त्यांच्या कुटुंबियांना हिंदू नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! येणारे वर्ष आपणा सर्वांना सुख समृद्धिचे, आरोग्याचे, उत्साहाचे, आनंदाचे व भरभराटीचे जावो. ही सदिच्छा!

होळीनंतर विविध रंगात रंगून गेल्यावर वेध लागतात ते चैत्र पाडव्याचे, हिंदू नववर्षाचा पहिला दिवस, तसेच पौराणिक महत्त्व असणारा दिवस. रामनवमी, हनुमान जयंती, अक्षय्य तृतीया असे सण सुरूच होतात आणि जूनमध्ये सुवासिनी वडाकडे सौभाग्याचे अक्षय दान मागतात. या सणांना धार्मिक, ऐतिहासिक महत्त्व आहेच तेव्हढेच वैज्ञानिक महत्त्व सुद्धा आहे. हे सण जगण्याची नवी ऊर्जा देतात. तशीच नवी ऊर्जा आता संपर्कमध्ये आणण्यासाठी या वर्षीपासून नवीन संपादक मंडळ स्थापन करण्यात आले आहे. यामध्ये अनुभवी ज्येष्ठांसोबत तरूण, उत्साही युवांचा समावेश आहे. संपर्कचा अंक वाचनीय करण्याच्या दृष्टीने अंकाच्या मांडणीत बदल करणे आवश्यक आहे. सध्या सुरु असणाऱ्या सदरांसोबतच काही नवीन सदरे सुरु करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पावले उचलत, या अंकापासून काही नवी सदरे आम्ही सुरु करीत आहोत. त्यापैकी एक म्हणजे आपल्या ज्ञातीतील यशस्वी लोकांची यशोगाथा. अनेकांना प्रेरणादायी ठरणारी ही गाथा ज्ञाती बांधवांपर्यंत पोहूचन अनेकांना यातून नवी दिशा मिळावी असा याचा हेतू आहे.

त्याच बरोबर सध्याच्या जगात काळासोबत राहता येण्यासाठी टेक्नोसॅव्ही असणे गरजेचे आहे. म्हणून बोक्या टेकबडे आपल्याला अपडेट करायला सज्ज झाला आहे. केवळ ज्येष्ठांनाच नाहीतर सर्वांनाच त्याचा उपयोग होईल. युवांनी एकत्रित येऊन काही उपक्रम राबविण्याकरीता त्यांना स्वातंत्र्य देऊन त्यांच्या उपक्रमांची माहिती तसेच महिलांच्या उपक्रमांची नोंदसुद्धा संपर्कमध्ये घेण्यात येत आहे. अशी नवीन सदरे सुरु करून संपर्कचा अंक अधिक वाचनीय करुन तो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे हे संपर्कचे उद्दिष्ट आहे. त्याद्वारे नवीन लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देता येईल.

त्याचबरोबर अनेक सभासदांना संपर्कचा अंक वेळेवर मिळत नाही अथवा मिळत नाही. संपर्कचा अंक सर्व सभासदांना वेळेत मिळावा यासाठी महासंघांच्या ई-मेल bkbmsindia@gmail.com वर किंवा टपालाद्वारे पत्ता बदलला असेल, त्यात काही त्रुटी असतील तर त्या कळवाव्या. जेणे करुन त्या त्रुटी दूर करुन सर्वांना अंक मिळेल याची खबरदारी घेता येईल. तसेच नवीन सभासद झाले तरी त्यांची माहितीसुद्धा कळविण्यात यावी म्हणजे सर्व सभासदांच्या नोंदी अपडेट होतील. तसेच यापूर्वीच्या प्रत्येक अंकामध्ये नमूद केलेल्या आवाहनाचा सुद्धा विचार होणे गरजेचे वाटते.

पुनश्च एकदा मराठी नववर्षानिमित्त सर्व सभासद, जाहिरातदार, सर्व संघ आणि त्यांचे प्रतिनिधी यांना हार्दिक शुभेच्छा!!

संपादक मंडळ.

पुणे, दि. ३०/४/२०१९

# साल्हेर


आदित्य पाध्ये, मुंबई
मो. : ९८९०४ २७३४२

या वर्षीचा स्वातंत्र्यदिन महाराष्ट्रातल्या सर्वोच्च किल्ल्यावर करायचा असं ठरलं आणि आम्ही तयारीला लागलो. ट्रेकला कोण कोण येणार, सामान काय घ्यायचं, कसं जायचं? अशा गोष्टींच्या चर्चेने जोर धरला. बरोबर घ्यायच्या सामानाची लिस्ट तर तयार होती, पण भिडूंची संख्या काही नक्की होती नव्हती. अशातच जुलैमध्ये झालेल्या प्रचंड पावसात साल्हेरवाडीकडे जाणारा पूल वाहून गेल्याचे कळले आणि दुसरा पूल गाळात गाडला गेल्याने रस्ता बंद आहे, अशी बातमी आली. ट्रेक रद्द तरी होणार किंवा दुसरा किल्ला करावा लागणार, अशी चिन्हं दिसत होती. पण ठीक आहे, अजून २ आठवडे हाताशी आहेत तोवर होईल सगळे ठीक, असं म्हणून तयारी सुरू ठेवली.

हो-नाही करता-करता ८ भिडू जमले. रस्ता सुरू झाला आहे का, पाऊस किती आहे? या गोष्टींची चौकशी करायला मित्रमंडळीत पाठवलेल्या निरोपांची उत्तरं पण यायला लागली होती. एकंदरीत सगळ्यांकडून 'पाऊस कमी झालाय, रस्ता सुरू झालाय, ट्रेक करायला हरकत नाही, पण तरीही ट्रेक पोस्टपोन करता आला तर बघा' असा निरोप येत होता. एक चान्स घेऊन बघू या, असं ठरलं. साल्हेरच्या पट्ट्यात असलेल्या किल्ल्यांची माहिती बरोबर घेतली. छोटा ग्रुप ही जमेची बाजू होती. सटाण्यात जायचं, तिथून जर 'नका करू' अशी माहिती मिळाली तर मागे फिरायचं आणि दुसरा किल्ला करायचा, असं ठरलं. सगळेच मुरलेले ट्रेकर असल्याने आल्या प्रसंगाला तोंड द्यायची सगळ्यांची तयारीही होतीच.

ट्रेक होणारच हे नक्की झाल्यावर शिधा, टेंट, रोप, किल्ल्यांची माहिती अशी कामं आपसात वाटून घेऊन तयारीला सुरुवात केली. १४ तारखेला सकाळी ५:३० ला अंबरनाथ सोडलं. कल्याणला दोघांना बरोबर घेऊन प्रवासाला सुरुवात केली. थंड वाऱ्याची मजा घेत श्रावणातला ऊन-पावसाचा खेळ बघत जात असताना इंद्रधनुष्य दिसलं आणि कॅमेरे सरसावले. तेवढी क्षणभर विश्रांती घेऊन पुढे निघालो. वाटेत दिसणाऱ्या किल्ल्यांची ओळख-परेड सुरू होती. या भागातले किल्ले म्हणजे सभोवतालच्या परिसरावर लक्ष ठेवण्यासाठी सज्ज असलेल्या रांगड्या पैलवान गड्यासारखे भासतात आणि ह्यांचे वस्ताद म्हणजे साल्हेर व सालोटा.

आताशा भुकेची जाणीव व्हायला



लागली होती, पण वेळेचं गणित आणि पुढली ठोस काही माहिती मिळाली नसल्याने गाडी दामटवत मुल्हेर गावात पोहोचलो. वाघांबे आणि साल्हेरवाडीत जाणारे दोन्ही पूल दुरुस्त झाले आहेत, शिवाय पाऊसही कमी झाला आहे, अशी सुखद बातमी मिळाली. जेवायची वेळ टळल्याने गावातल्या खानावळीत जेवण तयार होऊन मग जेवण्यात तासभर तरी वेळ मोडणार होता; म्हणून तिथल्याच एका छोट्या हॉटेलात झकासपैकी मटकीची उसळ आणि पाव हाणले. उदरभरण सुरू असताना वाघांब्यातले माजी सरपंच भेटले, त्यांच्याकडून सकाळीच बडोद्याचा एक ग्रुप साल्हेरवर गेला आहे, ही माहितीही मिळाली आणि आता ट्रेक १००% होणार, ही खात्री पटली.

वाघांब्यात आलो. सरपंचांच्या दारात गाडी लावली. सामान उतरवलं, पाठपिशव्या उचलल्या आणि साल्हेरकडे चालायला लागलो. साल्हेर आणि सालोटा दोघेही ढगांत लपून बसलेले. ढगांमुळे वाट चुकून भरकटू नये म्हणून वाट दाखवायला गावातलाच सचिन आमच्याबरोबर आला. एक छोटासा ओढा ओलांडला, भातशेतीतून वाट काढत पठारावर आलो आणि समोर साल्हेर-सालोट्याच्या खिंडीत घेऊन जाणारी सोंड दिसली. अनिश्चितता असतानाही जिद्दीने आम्ही इथपर्यंत आलो याचा वाऱ्याला इतका आनंद झालेला की, तो आम्हाला जागीच खिळवून ठेवत होता. सोसाट्याचा वारा अंगावर घेत पाठीवर ओझं घेऊन चालायला मजा येत होती.

खिंडीजवळ आम्हाला युथ होस्टेल बडोदा येथून आलेला ग्रुप भेटला. गुजरातमध्ये सह्याद्रीसारखा डोंगर-दऱ्यांतून फिरायचा अनुभव मिळत नाही, म्हणून मूळचे मुल्हेरचे असणारे सुनील पंडित दर वर्षी २०-२५ जणांचा ग्रुप घेऊन इथे ट्रेकला येतात, असं कळलं. गप्पांमध्ये लगेच काही ओळखीही निघाल्या. या गप्पा होईस्तोवर आमचा सगळा ग्रुप तिथवर आला होता आणि दम खाऊन ताजातवाना पण झालेला. अजूनही बराच पल्ला गाठायचा असल्याने त्यांचा निरोप

घेऊन आम्ही पुढे निघालो. झपझप पावलं उचलत खिंड ओलांडून साल्हेरच्या पायऱ्यांपाशी येऊन पोहोचलो. ३ सुंदर दरवाजे ओलांडून गुहांच्या समूहापाशी आलो, तेव्हा आजूबाजूला ढगांशिवाय काहीही दिसत नव्हतं.

ढगांमधून फिरत-फिरत चौथा दरवाजा गाठला आणि गंगासागर तलावाजवळच्या हनुमान मंदिराशेजारच्या गुहेत डेरेदाखल झालो. ओझी उतरवून फोटोग्राफी झाली आणि काही मंडळी गरमागरम सूप करण्याच्या कामाला लागली आणि बाकीचे टेंट उभे करण्याच्या कामाला लागलो.

एवढे उचलून आणलेत तर टेंटमध्येच झोपू या म्हणत उभे केलेले टेंट, सूप आणि खिचडी खाऊन होईपर्यंत वाऱ्याने साफ झोपवले. ते तसेच गुहेत आणले आणि तिथेच पथारी पसरली. सकाळी सोबत आणलेल्या खाऊचा फडशा पाडला. सगळं सामान आवरलं, कचरा गोळा केला आणि साल्हेर किल्ल्याच्या सर्वोच्च टप्प्याकडे म्हणजेच परशुराम मंदिराकडे निघालो. पण ढगांमुळे वाट सापडत नव्हती आणि ढगांमुळे वर कुणीकडे जातोय याचाही अंदाज येत नव्हता. शेवटी पायाखालची ठळक वाट सोडायची नाही, असं ठरवलं आणि पुढे निघालो. बऱ्यापैकी चढाई करून वर आलोय, असं वाटत असतानाच २ मिनिटांसाठी सगळं मोकळं झालं आणि समोरच मंदिराच्या पायऱ्या दिसल्या.

या वर्षीपासून दर वर्षी किल्ल्यावर १५ ऑगस्ट साजरा करायचा, असं ठरवल्याने बरोबर आणलेला झेंडा काढला. तितक्यात साल्हेरवाडीचे पोलीस पाटील आणि त्यांचे एक सहकारी तिथे आले. ते दोघेही झेंडा वंदनाकरता गडावर आले होते. मग त्यांच्यासोबतच झेंडा फडकवला, राष्ट्रगीत म्हणून मानवंदना दिली आणि आंबापोळी खाऊन स्वातंत्र्यदिन साजरा केला. पोलीस पाटील आणि त्यांच्या सोबत्याने आम्हाला बरोबर वाटेने पुन्हा गुहेपाशी आणून सोडले. त्यांचे आभार मानून आणि पुढल्या वेळी साल्हेरवाडीतून साल्हेर करू, असं सांगून आम्ही परतीच्या वाटेला लागलो.

ट्रेक सुरू झाल्यापासून ढगांमुळे अजूनपर्यंत एकदाही गडाचं दर्शन झालं नव्हतं, ह्याचंच वाईट वाटत होतं. पण तेवढ्यातच ढग बाजूला झाले. ऊन-सावल्यांचा खेळ सुरू झाला आणि सालोटा मोकळा झाला. कॅमेरे सरसावले. फोटो काढून पुन्हा खिंड ओलांडून सोंडेवर आलो, तर आता साल्हेरवरही उन पडलं होतं. जाता-जाता दोन्ही किल्ल्यांनी मनसोक्त दर्शन दिलं. काल आम्हाला भेटायला आलेला वारा आज 'चला बाबांनो, घराकडे लवकर जा,' म्हणत आम्हाला खाली लोटत होता. पुन्हा गाडीत बसेपर्यंत दोन्ही किल्ले अधूनमधून दर्शन देत होते.


# सप्तशती ज्वेलर्स



डोंबिवलीमध्ये सोन्या-चांदीची सुमारे ५०० दुकाने आहेत, त्यात आपल्या समाजबांधवांपैकी फक्त चारच आहोत. सप्तशती ज्वेलर्स हे त्यापैकी एक...

**कृपया आपले नातेवाईक व मित्रपरिवार यांना आपल्या दुकानाचे नाव जरूर सुचवावे आपल्याला सोने, चांदी, रत्नाप्रित्यर्थ काही माहिती हवी असल्यास कृपया फोन करावा अथवा समक्ष भेटावे. हिरे व नवग्रहाचे खडे पारखण्याचे वैज्ञानिक प्रशिक्षण आम्ही घेतलेले असल्यामुळे रत्नांची खरेदी करताना आमच्या ज्ञानाचा आपणाला अवश्य फायदा होईल.**

**रिकरिंग डिपॉझिट (भिशी) अंतर्गत आणि मर्यादित चेन, पाटल्या, बांगड्या, वेडिंग रिंग व मंगळसूत्र यावर मजुरी आकरली जात नाही. दरमहा किमान रुपये ५०० वा अधिक रक्कम ठेवल्यास दोन वर्षांनंतर चार हप्ते जास्त दिले जातात. जुने सोने व चांदी योग्य भावात विकत घेतो.**

***व्यवसाय करणाऱ्या आपल्या समाजबांधवांना यथायोग्य सहकार्य करण्याची आपली परंपरा आहेच, त्या परंपरेचा आम्ही नम्रपणे आदर करतो.***



दुकान नं. ५०७, तळमजला, बी/३ विंग, कस्तुरी प्लाझा सोसायटी, मानपाडा पथ, डोंबिवली पू. ४२१ ०२०१.



# For Vidarbha Star Aditya Sarwate, Life Hasn't Always Been Easy

सचिन ताटके
मो. : ९८६७१ ९२३१०

The in-form Cheteshwar Pujara – with his centuries in Australia and also the Ranji Trophy semi-final against Karnataka – was expected to stand between Vidarbha and the team's second consecutive Ranji title.


But he managed to score just 1 run in the final. Left-arm spinner Aditya Sarwate, 29, picked his wicket both the times.

In fact, Sarwate starred in his team's 78-run win over Saurashtra, picking 5/98 in the first innings and then scoring a vital 49 in the second innings to help set a 206-run target. He then returned to take six wickets in 24 overs to take his tally for the match to 11 wickets.

Sarwate, named Man of the Match of the Ranji final, also finished as the season's third-highest wicket-taker.

Life, however, hasn't always been a celebration for Sarwate.

25 years back, when Sarwate's father was making a routine road trip to Mumbai to meet his brother-in-law, a tanker smashed into his vehicle. The accident left him in a coma. He recovered consciousness but he was left paralysed for the rest of his life. Aditya was just 3.



Anand Sarwate – now 59 and also a former Nagpur University cricketer – may not be able to express happiness at his son's success but then again, he doesn't need to. 55 wickets in a single Ranji Trophy season would make any parent proud.

"My father is stable now, but the head injury he suffered is beyond repair. It was his dream that I play Ranji Trophy cricket and then go on to represent India. He was so delighted when we won the Ranji Trophy last season." Aditya Sarwate said to Mid-Day.

Aditya's mother Anushree Sarwate, a bank official, became the sole earner of the family after her husband's accident. Aditya grew up helping his mother in every manner – by feeding and bathing his father, and completing his education while pursuing his dream of playing professional cricket.

"He has seen so much struggle in life. In personal life with his father and then on the cricket field also. But he was so focussed – and all that trouble matured him early. He understands life. The accident changed him completely. When any young boy consults him, he always tells them to focus on studies. He, too, completed his graduation, a diploma in financial management that he topped," Anushree told The Indian Express.

## वृक्षाचे कथन

कवी : मिलिंद माईणकर , सोलापूर

थांब माणसा! क्षणभर थांब ।
कुऱ्हाड चालविण्याआधी,
थोडा तरी विचार कर।।
सावलीसाठी मला शोधतोस,
भूकेवेळी फळे मागतेस ।।

पारा चढताच वारा मागतोस
शेती साठी धारा मागतोस ।।
गुरासाठी चारा मागतोस,
राहण्यासाठी निवारा मागतोस ।।

एवढं सारं देऊन देखील,
रोज एक तरी झाड तोडतोसच ।।
तोडू नको एकहि झाड,
थांबव आता तुझी कुऱ्हाड ।।

# परदेशी प्रवासात अनुभवलेली माणुसकी

श्रीहरी गुणे
मो. : ८७८८७ २२८१३

माझे परदेशी प्रवास ज्येष्ठ नागरिक झाल्यानंतर, म्हणजे ६५ वयानंतरच सुरू झाले. असाच मुंबई ते ऑस्ट्रेलिया प्रवास करीत असताना मुंबईहून सिंगापूरला पोहोचलो आणि पुढे सिंगापूरहून ॲडलेडला जाण्यासाठी नियोजित प्रवेशद्वारापर्यंत जाऊन पोहोचलो. विमानात प्रवेश देण्यासाठी काही अवधी असताना माझे नाव पुकारून मला एका बाजूला खुर्चीवर बसण्यास सांगितले आणि इतरांना मात्र विमानात प्रवेश देण्यास सुरुवात केली. मला असे वेगळे बसवून विमानप्रवेश सुरू झालेला पाहून मी जरा धास्तावलोच. त्यामुळे मनात काही क्षणात भीतीने विचारांचे अनंत तरंग उठले. आपल्याला का असे बाजूला काढले? तिकीट, पासपोर्ट बरोबर आहेत; मग मी मला असे बाजूला काढण्याचे कारण समजून घेण्यासाठी तेथील प्रमुखाला विचारले आणि त्याचे उत्तर ऐकून इतक्या वेळची चिंता गेली, म्हणून दीर्घ श्वास सोडला. तो म्हणाला, ''तुम्ही ज्येष्ठ नागरिक आहात. तुम्हाला नेण्यासाठी गाडी येणार आहे.'' मी मनात म्हटलो, सुटलो एकदाचा! मी म्हटले ''मी एकदम ॲक्टिव्ह आणि फिट आहे, मला गाडीची आवश्यकता नाही.'' तर त्यावर ते म्हणाले, ''मग तुम्ही विमानात जाऊन बसू शकता.'' सुटलो एकदाचे, असे वाटले.

असाच दुसरा अनुभव मला परदेशात स्थानिक बसने प्रवास करताना आला. मी माझ्या नातीला बेबी सीटर(प्रॅम) गाडीतून शाळेत नेण्यासाठी बसथांब्यावर उभा राहिलो. बस आली, पण त्या बसला बेबी सीटर पार्क करण्याची सुविधा नव्हती. तरी बस चालकांनी बस थांबवून, खाली उतरून, बेबी सीटरची घडी घालून आम्हाला आत प्रवेश दिला आणि तसेच मुक्कामाच्या जागी



उतरवून तशाच प्रकारची मदत केली. इथे खरी माणुसकी दिसते. हे खरोखरी माणुसकीची उदाहरणे. आपल्याकडे आपण प्रगती केली म्हणतो. मोठे रस्ते, भरपूर गाड्या, उंच इमारती म्हणजे खरी प्रगती नाही, हा नुसता पोकळ बाह्य देखावा आहे. उलटपक्षी पूर्वी पेक्षा माणुसकी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. बेशिस्तीचा सुकाळ आणि माणुसकीचा दुष्काळ दिवसभर अनुभवास येत आहे.

असाच एक अनुभव म्हणजे, मी परदेशात स्थानिक बसने प्रवास करीत होतो. रोज तिकीट काढायला लागू नये म्हणून तेथे ठरावीक डॉलरमध्ये एक तिकीट मिळते, त्याने कोणत्याही ठिकाणी जा-ये करता येते. असेच तिकीट ते होते. मी ज्या बसने प्रवास करीत होतो, त्याच्या व्हॅलिडेटिंग मशीनमध्ये तिकीट प्रिंट न होता परत येत होते. प्रवास चालू झालेला होता. मग बसचालकाने मला बोलावून घेतले आणि माझ्याकडून तिकीट काढून घेतले. परंतु प्रवास चालू होता. परत पोटात भीतीचा गोळा. आपला प्रवास विनातिकीट धरणार का? आपल्याला दंड होणार का? परदेशी प्रवासी म्हणून आपल्या इकडच्या सारखे पोलीस ठाण्यावर नेणार का? असे एक ना अनेक प्रश्न मनात येऊन गेले. शेवटी माझ्या मुक्कामाच्या ठिकाणी मी बेल (घंटा) दाबली आणि चालकाला सांगितले मला उतरावयाचे आहे, ''कृपया माझे तिकीट परत करा.'' तेथील बसची दारे चालक बंद करतात व उघडतात. त्यामुळे आपल्याला बाहेर पडता येत नाही. तेव्हा त्यांनी त्याची नोंदवही काढून मला एक पाससारखा कागद दिला आणि म्हणाला ''या कागदावर तुम्ही पुढचा व परतीचा प्रवास करू शकता आणि पुन्हा एकदा मी हुश्श केले'' सुटलो म्हणून.

असे अनुभव भारतामध्ये गेल्या ६० वर्षांत एकदाही आढळून आले नाहीत. धन्य ती आपली माणुसकी!

## बेगडी खेळ

कवी : श्रीहरी गुणे

भाळी टिळा, गळ्यात रुद्राक्ष माळा
मनी नाही आस, वा विठूचा लळा ॥१॥
बैल दिवसभर नांगरी मळा
ओझे लाकडाचे, त्याचियाच गळा ॥२॥

सोंग श्वेत जरी, मनी तर काळा
प्रेमाविण कशास उगा उमाळा ॥३॥
मुखी ना प्रेम, तरी गळ्यात गळा
परी अंतरी नाही, खरा उमाळा ॥४॥

अवकळा आत बाहेर उजाळा
दाखविण्याचा सोस जगावेगळा ॥५॥
रूढी मनात भासवी सांभोळा
भुलू नका हो, अशा बेगडी खेळा ॥६॥

# प्रवासवर्णन - इंदूर, उज्जैन, मांडू

- उषा बा. कशेळकर

वर्ष २०१९ सुरू झाले. वातावरणातील गुलाबी थंडी जाणवत असताना सहलीचे वेध लागले नाहीत, तर नवलच! तशातच कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली, जि. ठाणे यांची दि.७/२/२०१९ ते दि. १२/२/२०१९




च्या दरम्यानची 'इंदूर-उज्जैन-मांडु' ही सहल निश्चित झाली. आमचा व्हॉट्स ॲपवर एक ग्रुप बनला आणि त्यावर आयोजक सहलीची माहिती देतच राहिले. त्यामुळे सहलीची वातारणनिर्मितीही छानच होत राहिली. म्हणता-म्हणता ७ फेब्रुवारी आलासुद्धा.....

पुण्याहून आम्ही तिघं दुपारी पुणे इंदूर एक्स्प्रेसमध्ये बसलो आणि आमचा प्रवास सुरू झाला. पुढे कल्याणाला २७ जण भेटले आणि गप्पा, गाणी, खेळ यांच्यात आम्ही इंदूरकडे कूच करू लागलो. पहाटेपर्यंत आम्ही मध्य प्रदेशामध्ये पोहोचलो होतो. सकाळी ८.४५ पर्यंत आम्ही सलग दोन वेळा स्वच्छ सर्वेक्षणात क्रमांक एक पटकाविणाऱ्या इंदूरला पोहोचलो. नेहा ट्रॅव्हल्स, मुंबईचे सहाय्यक तयार होतेच.

बसने हॉटेल 'कांचन तिलकला' पोहोचलो. आमचं सारं आवरून नाश्ता करून आम्ही पर्यटनस्थळं पाहण्यासाठी बाहेर पडलो.

दि. ०८/०२/२०१९ म्हणजे गणेश जयंती. त्यात आमच्या सहलीचा श्री गणेशा आणि पाहिलेलं पहिलं स्थळ म्हणजे बडागणपती मंदिर.. असा आमचा सुयोग आला. आणि मग काय नंतर नुसती भ्रमंती! चहा, नाश्ता करून रोज बाहेर पडायचे आणि पर्यटनस्थळं पाहून रात्री आपल्या बांधवांसोबत मनसोक्त भोजन करायचे, हाच आमचा कार्यक्रम. स्थळदर्शनांत अन्नपूर्णा मंदिर, लालबाग पॅलेस, हिंदोळा महल, जहाज महल, ध्वजराणा गणेश मंदिर, ॐकारेश्वर, महाकालेश्वर, शनिमंदिर यांसारख्या विविध ठिकाणी भेट आम्ही दिली.

मांडू येथील ऐतिहासिक वास्तू पाहताना आमच्या ज्ञानात खरोखरी भर पडली. असं करत-करत सहलीचा शेवटचा दिवस साजरा केला, सोबत माझासुद्धा ७५ वा वाढदिवस साजरा केला. पण मग शेवटच्या दिवशी सरप्राईज काय? आयोजकांकडून सर्वांना पेन दिले. ते बहुतेक हे प्रवासवर्णन लिहिण्यासाठीच असावे. संस्थेतर्फे श्री. नितीन आचार्य व त्यांच्या नेहा ट्रॅव्हलसला धन्यवाद पत्रक दिले. आयोजकांनी जमाखर्चाचा हिशोब करून शिल्लक राहिलेले पैसे परत पण केले. सौ. क्षमा धामणकर, सौ. पद्मजा पुरोहित, श्री. ओंकार खेर, श्री. अनिरुद्ध शेंबेकर, (पश्चिम कार्यकारिणी, डोंबिवली व महिला समिती) यांनी कष्ट घेत ही सहल यशस्वी केली.

सर्वांमध्ये मिळून-मिसळून, कोणताही आव न आणता, अहंपणा न बाळगता, अडी-अडचणी नाही ना याची खातरजमा करून हे सारं यांनी केलं. हे महत्त्वाचं.

परतीचा दिवस आला. दि. ११/२/२०१९ ला सकाळी खरेदी करून दुपारी इंदूर-पुणे एक्सप्रेसने परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. गप्पांमुळे गाडी पुढे जातेय, हे जाणवतही नव्हतं. रात्रीच्या वेळी पुरी-भाजीची पाकिटेही नेहा ट्रॅव्हल्स, मुंबईच्या नितीनमामांनी दिली होतीच. दुसऱ्या दिवशी पहाटे सारी मंडळी कल्याणला उतरली. आम्ही तिघे गाडीसह पुण्याकडे रवाना झालो.

जुन्या वास्तूतील इतिहास, महालांचे ऐश्वर्य, मंदिरांची भव्यता पाहून मिळलेली प्रसन्नता, उत्साहित मन व वेगळीच ऊर्जा घेऊन आम्ही घरी पोहोचलो. आयोजकांना खूप-खूप धन्यवाद!



# Who will look after your business? After You?

- Suhas Harshe
9822303290

Do you know what is the biggest challenge a business owner faces and which surprisingly he is least prepared about? It is not increasing sales, neither cash flows and nor manpower issues. All these he is well aware and prepared for. What he is not prepared for is : how his business will survive when he is not around?

Business owners are very passionate about their business. And therein lies the seed of the problem. You cannot take them out of their business or business out of them both are one and the same for them. Therefore, it is very difficult for them to visualize anyone-else running and managing their business. They feel - sometimes rightly - that no one can run the business as well as they can! They do not have a "succession plan" in place.

They have given the best years of their life to build the business of their dream; they have developed a loyal team of employees who are like their extended family; they have developed excellent relations with their vendors and suppliers over the years; they have generated wealth for themselves and their family; they have created economic value with the help of their products or services - but all this may come to nothing if they have not thought about continuation of business.

This is the biggest challenge faced by small and medium business owners - who have no one to take care of their successfully running business - either within the family or company. And it is this challenge they are least prepared for.

It makes immense sense for the business owner to plan for the future by preparing to hand over the business to someone capable - even if an outsider - to prevent the business from closing down or going down the drain.

The question is : Do we allow a fine running business on which depends the livelihood of many families of employees, suppliers, vendors to just disappear because there is no one to take care? Or do we find a way of identifying and selecting a suitable person - even from outside - to run the business and provide the satisfaction to the business owner that he has fulfilled his responsibilities? Is this possible? Is there someone who can help such business owners find such suitable person? Fortunately, there is. And it is a new service "Successful Succession".

**नवीन वर्षाच्या शुभेच्छा**

इच्छा कराल ते सर्व,
देव तुम्हाला देऊ दे ।
'भाग्यवान' शब्दाचा अर्थ,
तुमच्याकडे पाहून कळू दे ।
यशाची 'गुढी',
आभाळाला भिडू दे ।
पण, पाय मात्र जमिनीला,
खिळून राहू देत ।।

श्री. मिलिंद माईणकर,
सोलापूर



# ओघळणारे पाणी

**– विवेक नारळकर**

मो.नं. ९८५०८२८२२९

अहमदनगरच्या स्नेहालय संस्थेचे काम गेल्या ३० वर्षांत खूप विस्तारले आहे लाल बत्ती भागातील महिला, अनाथ मुले, निराधार मुली व महिला तसेच आजवर १५ वर्षांत 'स्नेहांकुर'द्वारे ३०० हून अधिक मुला-मुलींना दत्तक दिले आहे.

पुण्यात या संस्थेचा 'स्नेहाधार' प्रकल्प काही वर्षांपूर्वी सुरू झाला व १०-१५ सहकारी मोठ्या कौशल्याने तो चालवीत आहेत. नुकताच मला नगरला जायचा योग आला. निमित्त होते- सुमारे ४० वर्षे अमेरिकेत राहणारे व अनेक वर्षे आपटे कुटुंबीयांकडे येणारे रवी व चंदा आठल्ये यांना स्नेहालय- नगरचे काम बघावयाचे होते. ठरावीक दिवसांसाठी आले असल्याने मीच नोकरीतून रजा घेऊन त्यांना नगरला घेऊन गेलो. नगरमध्ये सुमारे ५-६ ठिकाणी काम विस्तारले आहे. प्रकल्प बघायलाही १ दिवस तसा कमी पडतो. नगरचे सहकारी भेटणार आणि प्रामुख्याने सौ. प्राजक्ता व डॉ. गिरीश कुलकर्णी भेटणार होते. त्यामुळे मी मनोमन खूष होतो. यांना भेटल्यामुळे मनातल्या अनेक विचारांना दिशा मिळते. २५-३० वर्षांनंतरही सामाजिक काम करूनही संघर्षाला आज कसे सामोरे जावे लागते, हे त्यांच्याकडून ऐकले की, आपल्या वैयक्तिक समस्या फार लहान दिसायला लागतात आणि जगण्यासाठी मोठी झेप घेण्यासाठी नवे बळ मिळते.



आम्ही स्नेहांकुर प्रकल्पावर पोहोचलो, त्या दिवशी मुंबईतून आलेले नायर दांम्पत्य त्यांच्या मुलीला घेऊन जायला आले होते. संस्थेतून न्याव्या लागणाऱ्या या बाळांची सर्व कायदेशीर प्रक्रिया काही महिने चालते ती त्यांनी पूर्ण केली होती आणि त्यांच्या 'श्रेया'ला न्यायला आले होते. सौ. व श्री. आठल्ये यांच्या हातून बाळाला देण्याचा छोटासा समारंभ मला अनुभवता आला. सौ. प्राजक्ताने गेल्या १५ वर्षांतील अडचणी तसेच आनंदाचे क्षण याचे समर्पक प्रास्ताविक केले. बाळाला औक्षण करून आई-बाबांच्या हातात देताना चेहऱ्यावरील आनंद वर्णनापलीकडचा होता. आठल्ये यांनीही त्या दोघांना खूप शुभेच्छा दिल्या व हिच्या आगमनाने येणाऱ्या प्रत्येक दिवसासाठी आशीर्वाद दिले. श्री. नायर यांना बोलण्याची विनंती केली. ते म्हणाले की आज आमच्या दोघांच्या आयुष्यातील इतका आनंदाचा दिवस आहे की- मी त्याचे वर्णन करू शकत नाही. यानंतर खरं तर ते बोलू शकत नव्हते त्यांच्या मनातल्या भावना. गालांवरून धारेसारखे पडणारे अश्रूच त्याची जाणीव करून देत होते. आजवर मी पाण्याची इतकी रूप पाहिली, पण इतके शुद्ध आणि आनंदाने ओघळणारे पाणी प्रथमच अनुभवले.!

---

# *जागताना या कळ्यांना*

जागताना या कळ्यांना, दु:ख कधी ना वाटते
खेद नाही, आयुष्य यांना अल्पसे जरी लाभते।

फूल होता, रूप आणि रंग सारे उधळिती
गंध लाभे जीवनाला, जरी पाकळ्या कोमेजती।

बोध घ्यावा, तत्त्व ऐसे जीवनाचे सांगती
कर्म मोठे! व्यर्थ सारे सांगणे 'मी पहा जगलो किती'
'मी पहा जगलो किती'।

**श्री. सुहास रघुनाथ पंडित, सांगली**
९४२१२२५४९१

# टेक्नॉलॉजी

– बोक्या टेकबंडे उर्फ केदार पाध्ये
मो.नं. ९७६२१७९३३२

टेक्नॉलॉजी... आजच्या काळातील सर्वांत प्रमुख आणि सर्वांत जास्त वेगाने विकासित क्षेत्र. टेक्नॉलॉजीने आपलं आयुष्य आजकाल फारच सुकर केलंय, नाही का?


पण ज्या वेगाने ती विकसित होतेय, त्या वेगाशी आपण स्पर्धा करू शकत नाही. आज हा शोध, तर उद्या तो. मग किमान दैनंदिन आयुष्यातील टेक्नॉलॉजी तर समजत राहावी; हो ना?

नेमक्या ह्याच विचारातून मी म्हणजे बोक्या टेकबंडे पुढे सरसावलो आहे. आपल्या दैनंदिन आयुष्यात उपयुक्त ठरणारी टेक्नॉलॉजी सोप्या शब्दांत समजावून सांगण्यासाठी. मोबाईल फोनची क्रांती झाल्यापासून अनेक कार्ये तो एवढासा मोबाईल फोन करू लागला आहे. आणि खरंच, संवाद साधणे ह्या प्रमुख कामाशिवाय इतर अनेक कामे करून, निरनिराळी इतर gadgets घेण्याच्या खर्चातून पण तो आपल्याला वाचवत आलेला आहे. मात्र हा फोन निवडणं फारच अवघड काम वाटू शकतं किंवा डोक्याला त्रास नको म्हणून आपण दुकानात जाऊन दुकानदार सांगेल तो फोन आणू शकतो.

पण आपली गरज दुकानदार कशी ओळखणार? चिनी मोबाईल घ्यावा की भारतीय? महागडा फोन घेण्याची गरज आहे का? एवढे पैसे नक्की कसले असतात? एकदाच महागातला घेतला तर पुढची पाचेक वर्षं ही चिंता मिटेल का?

हे प्रश्न तुम्हाला पडले असतील, तर हा लेख तुमच्यासाठी आहे. किमान शब्दांत कमाल माहिती देण्याचा माझा प्रयत्न असेल. आता आपण मोबाईल फोनच्या एकेका घटकाचा विचार करू.

**1. Android OS -** कॉम्प्युटरमध्ये वापरल्या जाणाऱ्या Windows सारखी ही कार्यप्रणाली आहे. वापरायला तुलनेने सोपी आहे. Applications (Messenger, बिलं भरता येणारी apps इ.) तयार करताना हिचा विचार प्राधान्याने




होतो. त्यामुळे आपला फोन ह्या प्रणालीतील अद्ययावत आवृत्तीने युक्त असला पाहिजे; जेणेकरून पूर्वीच्या आवृत्तीतील दोष कमी करून, वाढवलेले नवे ग्राहकाभिमुख फायदे आपल्याला मिळावेत.

**२. फोन बनविणारी कंपनी –** ज्या कंपन्या जास्त जाहिरात करतात, त्या महागडे फोन विकून जाहिरातीचा पैसा आपल्याच खिशातून काढणार आहेत. त्यामुळे कमीत कमी जाहिरात आणि जास्तीत जास्त Mouth Publicity असलेला Brand निवडायचा. शिवाय आपल्याला विक्रीपश्चात सेवादेखील महत्त्वाची आहेच.

**३. प्रोसेसर–** हा मोबाईल फोनचा सर्वांत महत्त्वाचा घटक. आपल्या फोनमध्ये किमान 'ऑक्टाकोअर' प्रोसेसर असावा. म्हणजे नक्की काय? तर अशी कल्पना करा की– प्रोसेसर ही अनेक सुविधा पुरविणारी कंपनी आहे आणि त्यातील 'कोअर' म्हणजे कामगार आहेत. ऑक्टाकोअर म्हणजे ह्यात ८ कामगार आहेत. जेव्हा एकाकडे कामाचा भार वाढेल. तेव्हा हे काम तो दुसऱ्याच्या मदतीने करेल. त्यातसुद्धा ४ कामगार हे जास्त ताकदीचे असतील, जे इतर चौघांना न झेपणारी महत्त्वाची कामे करतील. जेव्हा हा प्रोसेसर क्वाड्कोअर असतो, तेव्हा त्यात चारच कामगार असतात. त्यामुळे मोबाईल वापरताना अनेक कामं एका वेळी करू म्हटलं, तर त्यातून ते शक्य होत नाही. आता ह्या प्रोसेसरचे पण अनेक प्रकार असतात, पण त्यांच्या नावांमधील नंबर गेममध्ये अडकून पडण्यात काही अर्थ नाही. अगदी सामान्य वापर असणाऱ्या सर्वांना वरील शक्कल उपयोगाची ठरेल. फक्त एक महत्त्वाचं असं की, प्रोसेसरच्या नावातील आकडा जितका वरचढ तितका तो कमी वीज वापरेल आणि जास्त काम करेल.

**४. रॅम–** रॅम म्हणजे एक प्रकारे टेंपररी मेमरी आहे. ज्याप्रमाणे आपण बाजारात जाताना वस्तू लक्षात ठेवतो तशी ममेरी. त्यातील माहिती उद्या गरजेची नसते, पण आज महत्त्वाची असते. आजच्या कामांमध्ये उद्याची कामं टाकली की, गोंधळ ठरलेलाच. त्यामुळे हा रॅम किमान ३ जीबी असावा; जेणेकरून OS साठी

लागणारा १.५ जीबी वगळता आपण वापरत असलेली इतर Apps योग्य प्रकारे चालू ठेवण्यासाठी उरलेली मेमरी व्यवस्थित, गोंधळून न जाता काम करू शकेल.

**५. बॅटरी**– सध्या Whatsapp साठी आपलं इंटरनेट सारखं चालूच असतं, त्यामुळे बॅटरी किमान ३०००mah ह्या क्षमतेची असावी. फार खोलात न शिरता एवढंच सांगतो की, ही बॅटरी दिवसभर साथ देऊ शकेल. जुन्या फोनसारखा २-३ दिवस backup कुठलीच बॅटरी देणार नाही, कारण आता मोबाईलचे स्क्रीन झालेत मोठे, त्यामुळे ते जास्त विजेची मागणी करतात.

**६. कॅमेरा** – सध्या Megapixel हा शब्द चर्चेत आहे, म्हणून त्या उदाहरणाने सांगतो. Megapixel हे Resolution आहे. म्हणजे तो फोटोग्राफ किती मोठा करता येईल ह्याचं मोजमाप. फोटो चांगला येण्यासाठी मुळात कॅमेरा आणि त्यातील सेन्सर चांगला हवा ना. त्यामुळे दुकानात जाऊन डेमो पीस वापरून पाहायचा आणि १३ Megapixel किंवा त्याच्या पुढील कुठलाही कॅमेरा निवडायचा. सध्या आपले बरेच नातेवाईक परदेशात राहतात, त्यामुळे Video call करण्यासाठी पुढचा कॅमेरा पण ८ Megapixel असलेला कधीही चांगला. म्हणजे त्यांनाही आपण व्यवस्थित दिसू शकतो.

आता इतर प्रश्नांची संक्षिप्त उत्तरं देतो. जगातला १०० टक्के भारतीय कुठलाच मोबाईल फोन नाही. सगळे मोबाईल फोन चीनमध्ये तरी तयार होतात किंवा भारतात मोबाईल फोन तयार करणाऱ्या कंपन्या चिनी असतात. त्यामुळे माझ्या मते भारतात मोबाईल फोन तयार करणारी कंपनी निवडावी, तेवढाच आपल्या लोकांना रोजगार मिळेल.

वर सांगितल्याप्रमाणे मोबाईल फोन घ्यायचा ठरवला तर ८ हजारांपासून मिळतील, त्यामुळे फार पैसे घालायची गरज नाही. आणि तसंही मोबाईल फोनचं आयुष्य सरासरी अडीच वर्षं पकडून चालावं. बॅटरी तरी कमी काम करू लागेल किंवा प्रोसेसरला मोबाईल फोन सांभाळताना दडपण येऊ लागेल. नंतर नवा मोबाईल फोन घेऊ, तेव्हा अद्ययावत टेक्नॉलॉजी मिळेल.

तर....ह्या लेखापुरता इथेच थांबतोय. नवा फोन घेतलात की किंवा आत्ताही यु-ट्युबवर Bokya Techbande हा Channel शोधा, आणि सबस्क्राईब करून ठेवा; म्हणजे पुढचे व्हिडिओ तुम्हाला आवर्जून पाहता येतील, टेक्नॉलॉजी समजून घेता येईल. चला, भेटू पुढच्या लेखात.




# नीरा नृसिंहपूर

सौ. अंजली माईणकर
भ्रमणध्वनी : ७७७३९ ७३६७९

श्री लक्ष्मी-नृसिंह हे पुरातन देवस्थान नीरा आणि भीमा नद्यांच्या संगमावर वसलेले आहे. श्री. नृसिंह हे जागृत दैवत आहे. श्री लक्ष्मी नृसिंहाचे मुख्य मंदिर चिरेबंदी असून आकार षटकोनी आहे. मंदिरात प्रवेश करण्यासाठी ३३ उंच पायऱ्या चढाव्या लागतात. पायऱ्यांना लागूनच उजवीकडे नीरा नदीवरील घाट आहे. घाटाच्या मध्यभागी लांब-रुंद चौथरा व पायथ्याशी नदीपात्रात बुरूज आहे. मंदिराच्या पश्चिम प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस सोंड वर करून उभे असलेले दोन दगडी हत्ती आहेत. ते पाहिल्यावर गजान्त लक्ष्मीची ग्वाही देताहेत, असे वाटते.

मंदिराच्या दर्शनी भागाच्या डावीकडे भक्तनिवास आणि पश्चिमेकडे प्रशस्त नगारखाना आहे. दगडी बांधकामाच्या छतावरील देवतांच्या मूर्ती, बेलपाने व नक्षीकाम मनोवेधक आहे. देवालयाचा मुख्य दरवाजा पितळी असून दोन्ही बाजूला जय-विजय पुतळे आहेत. पितळी दरवाजापुढे लाकडी मंडप असून त्यापुढे भक्त प्रल्हादाचे मंदिर आहे. मंदिराच्या भोवताली नदीपातळीपासून ९० फूट उंचीचा भव्य तट आहे. श्री लक्ष्मी मंदिराच्या शिखराच्या पायथ्याशी वर्षभर पाणी ठिबकत असते. त्यास गुप्तगंगा असे म्हणतात. नीरा, भीमा या गंगा-यमुना, तर शिखर पायथ्याशी सरस्वती असा हा प्रयाग आहे- असे तुकोबांनी वर्णन केले आहे. गाभाऱ्यातील नृसिंह मूर्ती पश्चिमाभिमुख असून वालुका शिलेची आहे. मुख सिंहासारखे रुंद व उग्र, भव्य डोळे अशी उग्र चर्या आहे. ती मूर्ती समोरील प्रल्हादाकडे व दर्शनार्थी भक्तांकडे कनवाळू दृष्टीने बघत आहे असे वाटते. मूर्तीच्या डाव्या बाजूस अतिप्राचीन नृसिंह-शामराजाची मूर्ती आहे. पद्मपुराणात नृसिंहपूर क्षेत्राचे वैशिष्ट्य असे वर्णिलेले आहे की- मंदिराचा कळस जेथे आहे, तेथे पृथ्वीचा केंद्रबिंदू आहे.

जुन्या नृसिंह मंदिरात नृसिंह मूर्ती पूर्वाभिमुख होती. विठ्ठल शिवदेव विंचूरकर सरदारांनी १६७८ मध्ये नृसिंह मंदिराची पायाभरणी करण्यास सुरुवात



केली. नीरा व भीमा नदीतील प्रचंड शिळा व शिसे यांच्या साहाय्याने यंत्राकार चबुतरा बांधला. त्यावर भक्कम असा अंडाकृती घाट बांधला. त्यानंतर बुरुजाची बांधणी केली. मंदिराचे बांधकाम व त्यानंतर शिखराचे बांधकाम करण्यात आले. असा शिलालेख आहे. श्रींची मूर्ती नव्या मंदिरात पश्चिमाभिमुख करण्यात आली. विठ्ठल शिवदेव विंचूरकरांच्या ५ व्या पिढीचे वंशज रघुनाथराव विंचूरकर यांच्या कार्यकाळात नृसिंह क्षेत्राची भरभराट झाली. शिखरावर कळस चढवला, सुवर्ण ध्वज लावला आणि गरुडाची भव्य मूर्ती करवून घेऊन गरुडोत्सवास सुरुवात केली. श्रींच्या मूर्तीला सोन्या-मोत्याचे १००हून अधिक दागिने केले व १ किलो वजनाचा सोन्याचा मुकुट अर्पण केला.

मार्गशीर्ष महिन्यात मंदिराचा वर्धापनदिन, नृसिंह जयंती व गरुडोत्सव असे तीन उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होतात. महाप्रलयानंतर विष्णूंना सृष्टी निर्माण करण्याची इच्छा झाली. त्यांच्या नाभीतून कमळ व कमळातून ब्रह्मदेव निर्माण झाले. अज्ञानामुळे लोक विषयासक्त होतात. त्यांचा उद्धार करण्यासाठी शंकराने कायम तेथे राहावे, असे ब्रह्मदेवाने सांगितले. म्हणून श्री शंकर नृसिंह रूपात नृसिंहपूरला कायमचे राहू लागले.

श्री क्षेत्र नीरा नृसिंहपूर माळशिरस तालुक्याच्या उत्तरेकडे वसलेले आहे. इंदापूर शहरापासून फक्त ३ कि.मी. अंतरावर आहे. पुणे-सोलापूर महामार्गावरील टेंभुर्णीपासून १० कि.मी अंतरावर संगमस्थान आहे. तेथून रिक्षा व अन्य वाहनाने जाता येते.

नृसिंहाची एक मूर्ती वाळूची असून प्रल्हादाने स्थापना केली. दुसरी दगडाची मूर्ती खुद्द ब्रह्मदेवाने स्थापन केली. असे सांगतात. विजापूरच्या बादशहाने एकदा तेथे जाऊन देऊळ उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. परिणामतः बादशहाचे अंग सुजले आणि भयंकर वेदना होऊ लागल्या. देवाचा प्रकोप टाळण्यासाठी बादशहा पळून गेला. औरंगजेबाच्याही मनात मंदिर उद्ध्वस्त करण्याचा विचार होता. पण त्याने हल्ला करण्यापूर्वीच पुजाऱ्याने मंदिरातील मूर्ती आवारातील झाडाखाली लपवून ठेवली. औरंगजेब हताश होऊन निघून गेला.

# गेट-टू-गेदर कशासाठी?

सौ. शुभदा गुर्जर, पुणे
मो. : ८३९०२ ९००४५

रात्री २ वाजता अचानक फोन वाजला. थोड्या काळजीनेच उचलला. तर समोरून वरूण बोलत होता. ''काका, ताबडतोब हॉस्पिटलमध्ये या. मधूला ॲडमिट केलेय... आणि डॉ. म्हणतात, घरातील मोठ्या माणसाना बोलवा.'' मी 'येतो' बोलून फोन ठेवला आणि बायकोला घेऊन निघालो. जाता-जाता नकळत मन भूतकाळात गेले.

वरुण एक I.T. इंजिनिअर. MBA अतिशय हुशार मुलगा. माझा दूरचा नातेवाईक, पण जवळच राहणारा. आई-वडील गावी. तसा तो स्वभावाने हेकट. माझे कोणावाचून काही अडत नाही, या वृत्तीचा. माझा मोबाईल आणि इंटरनेट हेच माझे विश्व, असे मानणारा.

दोन वर्षांपूर्वी अचानक घरी पेढे घेऊन उभा राहिला. ''काका, लग्न ठरलंय...'' मी ताबडतोब मोठेपणाचा आव आणून विचारले, ''अरे वा! कधी?'' कुठे पाहिलीस मुलगी? कोणी ठरविले?''


तो फक्त हसला. ''काका, काय गरज आहे कोणाची? एका साईटवर तिला पाहिले, आवडली. व्हिडिओ पाहिला तिचा. तिचा आणि माझा प्रोफाईल जुळला आणि आम्ही ठरविले. इथून जात होतो, म्हणून तुम्हाला सांगायला आलो...''

''अभिनंदन! मग आता पत्रिका कधी छापू या, खरेदी वगैरे...'' माझा मोठेपणा चालू झाला. तर, तो जोरात हसला. ''काहीही गरज नाही. मी व्हाट्स ॲपवरून सगळ्यांना आमंत्रणे पाठवली आहेत आणि खरेदीही ऑनलाइन केली आहे. इथे वेळ कोणाला आहे? खूप कामे असतात.''

माझा थोडा हिरमोड झाला... म्हटले, ''अरे, बायकोला तरी वेळ देतोस का?''

''नाही हो, तीही माझ्यासारखी बिझीच. मग वेळ मिळेल तेव्हा व्हाट्स ॲपवर चॅट करतो, सेल्फी काढतो, व्हिडिओ पाठवतो.'' मी न राहवून हात जोडले.

काही दिवसांनी आम्ही त्याच्या लग्नाला गेलो. फक्त ५० माणसे हजर पाहून धक्काच बसला. स्टेजवरही आहेर द्यायला गर्दी नव्हती. 'अरे, ह्याने आहेर आणू नये, असे लिहिले होते की काय? ह्या विचाराने थोडा सुखावलो. भेटायला गेलो तेव्हा विचारलं, ''इतकी कमी माणसे कशी आली?'' तेव्हा परत तो हसला आणि



म्हणाला, ''सगळ्यांनी व्हाट्स ॲपवर अभिनंदन केले, शुभेच्छा दिल्या आहेत... तो बघा एक माणूसच खास रिप्लाय द्यायला ठेवलाय.''

मी उडालोच. ''बरे, आहेरचे काय?'' माझा बालसुलभ प्रश्न.

त्यानेही लहान मुलाला समजवावे तसे मला सांगितले, ''अहो काका, प्रत्येकाच्या घरी मिठाई आणि गिफ्ट्स पाठवले आहे... कुरीअरने अगदी घरपोच डिलिव्हरी.'' ''धन्य आहेस बाबा तू.'' मी हाथ जोडले आणि पोटभर जेवून निघालो.

दुसऱ्या दिवशी पूजेला गेलो, पण या वेळी घरात ६ माणसे बघून मुळीच आश्चर्य वाटले नाही. सर्व कसे आरामात बसले होते. म्हटले, ''अजून भटजी आले नाही वाटते?'' ''तेव्हा उत्तर आले अहो काका, रेकॉर्ड लावून पूजा केली, अगदी पूर्णपणे. कुठेही शॉर्टकट नाही. कशाला हवाय भटजी? प्रसादाची ऑर्डर दिलीय आता येईल. शिवाय १५ माणसांचं जेवण सांगितले आहे..''

चला म्हणजे माझे जेवण होईल इथे. मी सुखावलो. परत एकदा पोटभर जेवून समाधानाने घरी आलो...

काही दिवसांनी तो रस्त्यात भेटला. एकटाच होता म्हणून विचारले, ''अरे, कुठे गेलास की नाही हनिमूनला? तर नेहमीसारखे हसून बोलला, कुठे वेळ आहे काका? तोही नवीन प्रोजेक्टमध्ये बिझी ती आणि मीही.'' मी अचंबित झालो.

मग मित्रत्वाच्या नात्याने त्याच्या खांद्यावर हात ठेवून विचारले, ''कधी तरी सेल्फी आणि व्हिडिओ?''

''कप्पाळ!!'' ''मग नाटक-सिनेमा तरी?''

''अहो, नवीन चित्रपट आला की download करतो आणि पाहिजे तेव्हा बघतो. वेळही वाचवतो.'' मी दर वेळी नवे-नवे धक्के खात घरी येत होतो.

आता काही महिन्यांपूर्वी त्याचा messege आला- बायकोला दिवस गेले आहेत. पटकन मनात आले.... हेही ऑनलाईन नाही ना?? फोन करून त्याचे अभिनंदन केले आणि काही मदत पाहिजे का, असे विचारले. पुन्हा त्याचे परिचित हास्य ऐकून नवीन काय ऐकायला मिळेल याची उत्सुकता लागली. त्याने सांगितले ''काही गरज नाही काका. हिचे सर्व काही

करण्यासाठी एका कंपनीला ऑनलाइन पॅकेज दिले आहे. आता ते लोक हिची व्यवस्थित काळजी घेतील. मला फक्त बाळाला हातात घ्यायचे आहे...''

हे मात्र अतीच झाले. मी थोडा चिडलोच आणि तणतणतच घरी आलो.

हॉस्पिटलमध्ये शिरत असताना हे सर्व आठवले आणि समोरच हा उभा राहिला. रडवेला चेहरा, खांदे झुकलेले. आम्हाला बघून त्याचा बांध फुटला... माझ्या कुशीत शिरून हमसाहमशी रडू लागला. मी विचारले ''अरे, काय झाले? तू तर पॅकेज दिले होतेस ना? मग अचानक काय झाले?'' तर म्हणाला, ''त्यांनी मधूची क्रिटिकल कंडिशन पाहून हात वर केले... डॉक्टरांनीही सांगितले, तुमचे कोणी तरी नातेवाईक बोलवा... परिस्थिति गंभीर होत चालली आहे... इथे मला सगळ्यांनी एकटेच सोडले. सगळे जण भावनाशून्य चेहऱ्यानी वावरत होते. त्यांना फक्त त्यांच्या पॅकेजशी मतलब आहे...''

आज मला जाणवले की, आपलेपणाची भावना असलेले पॅकेज कितीही किंमत दिली तरी विकत मिळत नाही... अजूनही वेळ गेली नाही. आपली माणसे सांभाळा. एकदा का माणूस गेला की, परत येत नाही. मग राहतात त्या फक्त आठवणी. पॅकेजप्रमाणे कृत्रिम नाती. तेव्हा लॅपटॉप, टीव्ही, मोबाईल बाजूला ठेवा आणि आपल्या स्वतःच्या माणसाशी प्रेमाचे दोन शब्द बोला. वेळेवर त्यांची कदर करा. तेच तुम्हाला वेळ देतील, प्रेमही आनंदही... जे जगात लाखो-करोडो रुपये खर्चूनही कुठेही मिळणार नाही कोणीही देऊ शकणार नाही, फक्त हे वेळेत समजले तर खूप मिळवले.....!

# साले, शिरा, बियासुद्धा खा! (प्रक्रिया करुन)

श्रीहरी गुणे
मो. : ८७८८७ २२८१३

आपल्याकडे अनेक पालेभाज्या, फळभाज्या आणि फळे आहेत. काही फळे आपण साले, बियांसह खातो; परंतु बरीच फळे, भाज्या आपण साली, बिया, शिरा काढून मग भाज्या करतो, किंवा ती फळे खातो. वैज्ञानिकांच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की- अशा बिया, शिरा आणि फळाच्या सालींमध्येसुध्दा अनेक पोषणमूल्ये, जीवनसत्त्वे, मिनरल्स धातू, अमिनो ऑसिड्स, अँटी ऑक्सिडंट - रोगजंतू प्रतिकारशक्तीचे घटक असतात त्या सर्वांची आपणास आरोग्याच्या दृष्टीने गरज आहे. वरील दोन्ही गोष्टी आपल्याला पुढील गोष्टीमधून सहज समजून येतील.

वरील सर्व प्रकार हे नैसर्गिकरीत्या आपण बिया लावून जमिनीमधून निर्माण करतो- म्हणजे मुळापासून शिरा, झाड, पाने, फुले, फळे इत्यादी तयार होत असतात. त्या वेळी जमिनीमधील, मातीमधील मिनरल, क्षार इत्यादी घटक, पाणी, हवामान, ऊन, पाऊस, सूर्यप्रकाश यामुळे पानामध्ये, फळामध्ये जर सर्व घटक तयार होतात; तर ते साली, शिरा, बियांमध्ये कोणते ना कोणते तरी घटक असणारच! आपण बऱ्याच वेळा साली, शिरा इत्यादी घटक जनावरांना खायला घालतो, ते प्राणी धष्टपुष्ट होतात. म्हणजे आपण बरीच पोषणमूल्ये वाया घालवत असतो तेव्हा आपण पूर्णपणे पोषणमूल्यांचा उपयोग कसा करू शकतो याचा विचार करावा. ती पोषणमूल्ये कशी मिळवता येईल यावर मार्ग शोधला, तर नक्की सापडेल. त्यापैकी काही पुढे सुचवत आहे.

१. बऱ्याच आशियाई देशामध्ये (चीन, जपान, इ ठिकाणी) पालेभाज्या, फळभाज्या स्वच्छ धुऊन घेऊन पाणी उकळवून घेऊन त्यामध्ये त्या भाज्या घालतात. त्यामध्ये त्याचा अर्क उतरला की 'ते सार', 'सूप' म्हणून जेवणापूर्वी भूक वाढविण्यासाठी वापरतात. नंतर त्या शिजलेल्या भाज्या-तयार भातामध्ये मिसळून तो भात जेवणामध्ये घेतात. त्यामुळे पूर्णपणे त्या पदार्थांमधील सर्व पोषणमूल्ये, तंतुजन्य पदार्थसुद्धा आपल्याला त्यामधून मिळतात.

२. पापडी, मटार अशा शेंगा प्रकारामध्ये मोडणाऱ्या पदार्थांच्या टरफलांमध्ये निरनिराळ्या प्रकारची ७/८ अमिनोॲसिड असतात. त्या जर कोवळ्या असतील, तर चांगल्या शिजवून-मीठ, मिरपूडसारखे पदार्थ वापरून चविष्ट पदार्थ तयार करता येऊ शकतात.

# यज्ञोपवित

श्रीरंग हिर्लेकर, अमरावती.
मो. ९४२२१११८९३.

**ब्राह्मणाची, जानव्याची चेष्टा करणाऱ्यांनी त्यामागची ही दिव्य कारणे आणि परंपरा लक्षात घ्यावी.**

यज्ञोपवित म्हणजे जानवे, हे सर्वांना माहीत आहे, मात्र याच्याविषयी नेमकी माहिती फार थोडयांना असेल. सर्वसाधारण जानवे म्हणजे ब्राह्मणाची ओळख, असा समज असला तरी तो तितका बरोबर नाही. तीनही वर्णांनी हे धारण करावे, असे सांगितले आहे. अर्थात त्याच्या पद्धती, प्रकार, धारण करण्याचा विधी ह्यात अंतर असले तरी सर्वांचा हेतू पावित्र्याचे, ज्ञानाचे, अधिकाराचे निर्देशक चिन्ह असाच गृहित आहे. **यज्ञोपवितं परमं पवित्रं** यातून हेच सूचित होते.

जानवे का घालावे? हे धारण केले म्हणजे काही विशिष्ट धार्मिक अधिकार प्राप्त झाल्याचे हे चिन्ह समजण्यात येते त्याचबरोबर काही धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक अशी मोठी जबाबदारीही हे धारण करणाऱ्यांकडून अपेक्षित आहे. बाल्य संपले, व्रतबंध झाला की ज्ञान मिळण्याचा मार्ग सुरू झाल्याचे हे चिन्ह आहे. विद्यापीठातील प्रवेशाचा ड्रेसकोड, तसेच हे आहे. आणि म्हणून कर्तव्याच्या जबाबदारीची जाणीव म्हणून काही बंधने आपोआपच जानवे धारण करणाऱ्यांकडून अपेक्षित आहेत. याचे नावच मुळी यज्ञोपवित. ब्राह्मणाची, जानव्याची चेष्टा करणाऱ्यांनी त्यामागची ही दिव्य कारणे आणि परंपरा लक्षात घ्यावी.

पण पवित म्हणजे पवित्र असा अर्थ जर चटकन् कोणी घेत असेल, तर तो चूक ठरेल. विद्यापीठाच्या पदवीप्रदानाच्या वेळेस स्नातकाला उपरण्यासारखे खांद्यावरून एक वस्त्र टाकतात, तसेच हे जानवे ज्ञान्यार्थ्याने आपल्या डाव्या खांद्यावरून धारण करावयाचे उपवस्त्र आहे. ज्ञानयज्ञाच्या आरंभापासून धारण करावयाचे उपवित म्हणजे हे जानवे. भाषाशास्त्र आणि अपभ्रंश कसे होतात हे ज्यांना कळते, त्यांना यज्ञोपवित मधील 'य' चा 'ज' झाला, मधली अक्षरे गळाली आणि वित म्हणजे वे (यज्ञोपवित--यज्ञ-जान-वित-वे )ही प्रक्रिया समजेल.



वर विद्यापीठाचा ड्रेसकोड असे लिहिले आहे. जानवे हे ज्ञानाचे प्रतीक. **सुखार्थिन: कुतो विद्याम्**? विद्यार्थी जीवनात चैन आणि विलासाला जागाच नाही. म्हणून लाडक्या मुलाच्या मुंजीत हौसेने सोन्याचे जानवे करणाऱ्या श्रीमंत बापाच्या बुद्धीची कीव करावी, असे वाटते.

उपनयन होताच गुरुगृही शिकावयास जाण्यापूर्वी यज्ञोपवित धारण करण्यात येते. ते धारण करण्याचा विधीही आदर्श आहे. अधिकारी पित्याने आपल्या ज्ञानाची दीक्षा मुलाला देऊन ज्ञानाचे हे सूत्र त्याला द्यावे. त्यानेही हे सूर्याच्या दिशेने उंचावून दिव्य अशा सावित्री किंवा गायत्री मंत्रातून व्यक्त होणाऱ्या 'धी' म्हणजे धारणा (बुद्धीची) अपेक्षा करत हे ब्रह्मसूत्र धारण करावे. एक प्रकारे ही कमिटमेंट आहे.

तीनही वर्णांच्या उपनयनविधीत आणि यज्ञोपविताच्या प्रकारात अंतर आहे. आजकालच्या अनेक पुरोहितांना हे माहीतही नाही. मात्र छत्रपतींना राज्याभिषेक करणारे थोर विद्वान, **वेदशास्त्रसंपन्न गागाभट्ट** अशी चूक करणार नाहीत. राज्याभिषेकापूर्वी त्यांनी **छत्रपती शिवरायांचे उपनयन** संस्कार केले, त्या वेळेस त्यांनी गायत्री आणि सवित्री मंत्रांचा हा भेद तसेच यज्ञोपविताचा रंग हा विचार निश्चितच केला असला पाहिजे.

अनेकांना माहीत नाही; पण आपण जो **तत्सवितुवरेण्यं...** हा मंत्र म्हणतो, तो गायत्री नसून सावित्री मंत्र आहे. सावित्री म्हणजे सूर्याचा मंत्र. मात्र गायत्री नावाच्या छंदरचनेत केला म्हणून त्याचे नाव गायत्री पडले, इतकेच. हा ब्राह्मणांनी म्हणावा.

क्षत्रियांच्या व्रतबंधात त्यांना जी दीक्षा दिली जाते, तो खरा गायत्री मंत्र. तो पुढीलप्रमाणे आहे.-

**आकृष्णेन रजसा वर्तमानो विवेशयन् अमृतं मर्त्यच ।**

**हिरण्मयेन सवितारथेना देवो याती भुवनानि पश्यन् ।।** **ऋग्वेद -१.३५.२.**

याचा अर्थ असा : काळ्या अंतरिक्षाच्या मार्गावर चालणारा मर्त्य आणि अमर अशा सर्व जीवांना कार्याला प्रवृत्त

करणारा हा सूर्यनारायण सोन्याच्या रथातून येत सर्व जगाला बघत आहे. या मंत्रात देवाला बुद्धी दे (धियोयोन: प्रचोदयात्) अशी फक्त मागणी नसून क्षत्रियांनी कार्यप्रवृत्त होत विजयाच्या सुवर्णयुगातून राष्ट्राला वैभवाला न्यावे, असा होतो. (संदर्भ : साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास) याचप्रमाणे **वैश्यांनी म्हणावयाचा मंत्र निराळा सांगितला आहे.**

**कसे असावे**? उपनयन करण्याचा अधिकार तिनही वर्णांना आहे. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या तीनही वर्णांचे उपनयन केले जाते. त्यांच्या सामाजिक कर्तव्याच्या दृष्टीने त्यांचे शिक्षणही निराळेच असणार. अर्थात त्यामुळे या उपनयनाचे आणि त्यानंतर धारण करावयाचे यज्ञोपवित म्हणजे जानवे हेही निराळेच असले पाहिजे आणि ते तसे सांगितले आहे. ब्राह्मणांचे कापसाच्या सुताचे शुभ्र पांढरे, क्षत्रियांचे सोनेरी-पिवळ्या रंगाचे, तर वैश्यवर्गाचे लोकरीचे. डावा खांदा अशासाठी की, उजवा हात मोकळा राहावा. श्राद्धविधीच्या वेळेस सर्व व्यवहार डाव्या हाताने करावयाचे म्हणून त्या वेळेस जानवे उजव्या खांद्यावर घेतात.

**जानव्याची लांबी** : मोठ्या माणसाचे जानवे तोडून त्याच्या दोऱ्याची लांबी मोजली, तर ती ९६ अंगुळे भरते. म्हणजे ७२ इंच. गोलकरूप गाठ मारली की, ते ३६ इंच परिघाचे होते. म्हणजे ११.५ इंच व्यासाचे. जानव्याची लांबी म्हणजे ज्याच्या-त्याच्या उंचीच्या ९६ अंगुळे. कारण बोलून-चालून हे उपवित म्हणजे वस्त्र. आपण वस्त्राचे माप शरीराप्रमाणे घेतो, तसेच जानव्याचेही आहे. अनेक जण ९६ अंगुळे म्हणजे ५ महाभूते, ५ तत्त्वे, १० इंद्रिये, १२ राशी, २७ नक्षत्रे अशी गणिते सांगतात.

**जानव्याचे ३ पदर** : हे ३ काल, ब्रह्मा विष्णु आणि महेश हे ३ देव, सत्त्व, रज आणि तम असे ३ गुण, जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती या ३ अवस्था, स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ हे ३ लोक आणि कुंडलिनीच्या इषा, पिंगला आणि सुषुम्ना नाडी या सर्वांची आठवण राहावी म्हणून सांगितले आहेत.

**उपनयनविधीचे आदर्श वय :** ब्राह्मणाने ज्ञानार्जन करावे, क्षत्रियाने रक्षण करावे आणि वैश्याने समाजाला आवश्यक असा व्यापार करावा, ही पद्धत होती. ज्ञान मिळवायचे तर अगदी लहानपणापासून. म्हणून ब्राह्मणाचे उपनयन बालवयात ५व्या किंवा ८व्या वर्षी, क्षत्रियाचे कुमार वयात ११व्या किंवा १२ व्या वर्षी, तर वैश्याने १२ किंवा १६ व्या वर्षात करावे.

**ज्योतिषशास्त्र आणि जानवे :** यज्ञोपवीतं परमं पवित्रं । प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात। म्हणजे हे परम पवित्र असे उपवस्त्र प्रजापतीबरोबरच उत्पन्न झाले, असा अर्थ. जानवे हे पूर्वी उपरण्यासारखे होते आणि ते कमरेभोवती गुंडाळले जाई. (तृतीयं उत्तरीयार्थं वस्त्राभावे तदिष्यते ।) निवित म्हणजे पुढे ते गळ्यात पडले. गळ्यातील माळेसारखे. (संदर्भ : तैतिरीय संहिता). त्यासोबत मृगजिन म्हणजे हरणाच्या कातड्याचा तुकडा. प्रजापतीने मृग म्हणजे हरणाचे रूप घेतले. आकाशातील मृग नक्षत्र. त्याच्या कमरेचे वस्त्र म्हणजे आकाशगंगा म्हणजे आजचे जानवे. आणि गाठ म्हणजे विश्वाचा केंद्रबिंदू. उपनयन झालेल्या मुलाला प्रजापतीची उपमा देतात. तो आता पराक्रमाला निघालेला प्रजापतीच आहे. अशीच प्रथा पारशी समाजात आहे. त्यांच्याकडेही आपल्यासारखेच जानवे ही कल्पना आहे. त्याला त्यांच्याकडे **कस्ती** असे नाव आहे. फक्त ते गळ्यात घालतात, इतकेच.

**जानव्यांची संख्या :** याविषयी सांगावयाचे म्हणजे मुंजीनंतर पण सोडमुंजीपूर्वी १ जानवे, सोडमुंजीनंतर २, वडील गेल्यावर ३ आणि संन्यास घेतला तर जानवे काढून टाकतात. म्हणजे एकही नाही. काही पद्धतीत वडील गेल्यावर जानवे हे गळ्यातील माळेप्रमाणे घालावे; त्याला निवित असे म्हणतात.

मुंजीनंतर जानवे का घालावे याचे उत्तर वर येऊन गेले आहे. सोडमुंजीनंतर गृहस्थाश्रमात जाताना २ जानवी घालतात. पूर्वी मुलींचाही व्रतबध होत असे. हल्ली सहसा कोणी करत नाही. त्यामुळे गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यावर सहधर्मचारिणी म्हणून तिच्या जबाबदारीचे म्हणून आणि तिच्या वतीने म्हणून दुसरे जानवे घातले जाते.

वडील गेल्यावर आता एक पिढी संपली, कुटुंबाचीही जबाबदारी आता स्वत:वर पडली, याकरता त्यांच्या वतीने म्हणून तिसरे जानवे घातले जाते. असा एक विधी श्राद्धकर्मात आहे. वडिलांचे दहा दिवसांचे क्रियाकर्म करताना पण आजोबांचा एक पिंड कमी करून तो त्याआधीच्या वंशातील पिंडात मिळवतात. नंतर वडील, आजोबा इतक्याच दोन पिढ्यांचे आता पिंड ठेवतात. तसे आता वडील गेले, तेव्हा त्यांच्या नावाचे जानवे स्वत: धारण करायचे. म्हणून ३ जानवी.

आपल्याकडे ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि शेवटचा संन्यासाश्रम असे चार आश्रम सांगितले आहेत. संन्यास या शेवटच्या आश्रमात सर्वच बंधने सोडावयाची. इतका सर्वसंग परित्याग करावयाचा की, स्वत:चे श्राद्धही स्वत:च उरकून टाकावयाचे. मग अशा परिस्थितीत हे जानवे आणि त्यामागची कारणे ही पण त्यागावयाची. म्हणून संन्यास घेताना जानवेसुद्धा काढून टाकले जाते.

# पदर

लीला भागवत, सोलापूर.
मो. ९४२२१११८९३.

पदरालासुद्धा अनेक असतात पदर, पदरावरून सुद्धा त्याचा ठरतो दर
पदराचा वापर अनेक पदरी, कधी डोक्यावरी, तर कधी खांद्यावरी,
पदर दाखवतो कुलीनता, पदर दाखवतो शालीनता
पदराच्या आत बाळाचे जेवण, पदराची चुंबळ त्यावर मोठ्याचे जेवण
पदर वाऱ्यावर फडफडतो, पदर दुसऱ्याला तडफडवतो
पदराआडून लाजणं, पदर घेऊन मुरडणं
पदरामुळे साडीला शान, पदर आल्यानं येतं भान
पदराला पदर लावून सौभाग्याचं वाण, पदराचं खर्च करून दुसऱ्याला मान
पदर अश्रू पुसतो, पदर घामही पुसतो
पदर धुतलेला चेहरा पुसतो, पदर बांधल्याने जोश येतो
पदराला हात पुसत विचारपूस होते, पदरात काय पडलं म्हणून विचारणा होते.
पदर पसरून मागता येतं, पदरात बांधूनही घेता येतं
पदराची गाठ नवऱ्याशी असते, पदराला गाठ बांधून विसरायचं नसतं
पदरात चेहरा लपवता येतो, चेहऱ्यावर पदर ओढला की घुंगट होतो.
पदराला धरून हट्ट करता येतो, चेहऱ्यावर पदर धरून जायलाही मिळतं
पदर तोंडात धरून हुंदका थोपवता येतो
पदर गळ्याभोवती आवळून जीव घेता येतो
पदराचं असे अनेक पदरी काम,
जसं ज्याचं काम, तसा त्याला दाम
पदरच अडकतो खिळ्यामध्ये, पदर खिळतो मनामध्ये
समर्थ माणसाच्या पदराखाली असलं की माणूस निर्भय बनतो.
पदराचं छत्र असलं की सशाचा सिंह होतो
पदरात चुका घालता येतात,
चुकीवर पदर घालून त्या झाकताही येतात
पदरचं घालून सांगताही येतं, नाकाला पदर लावून हसताही येतं.
मानाचे सुद्धा असंख्य पदर असतात, जसा मनीभाव, तशा गोष्टी घडतात
कृष्णाला जखम झाली म्हणून द्रौपदीने फाडला पदर
वस्त्रापेक्षा माणूस मोठा म्हणून तिची झाली कदर
वाळवताना सांगतात दुपदरी घाल, चौपदरीच्या पांघरुणात उब असते छान

।। श्री आर्यादुर्गा प्रसन्न ।।

गणेश गुर्जर परिवारातर्फे कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास
हार्दिक शुभेच्छा!



व्यावसायिक प्रतिष्ठान
SDS ENTERPRISES
'Sarthak', 4/5/5 A, Erandwane, Patwardhan Sahakari
Grih Rachana Sanstha Mydt, Pune 411 004.
Solution for all Computer Needs

# सिंधुदुर्ग जिल्हा ब्राह्मण संघ

## संघाचा वर्धापनदिन समारंभ

सदरहू कार्यक्रम श्री मंगल कार्यालय, सावंतवाडी येथे दि. २६/१/१९ रोजी दुपारी ३.३० वाजता सुरू झाला. कुमारी मानसी शेजवलकर हिच्या 'गणेशवंदना' या नृत्याने सुरवात झाली. जिल्हाध्यक्ष श्री. प्रदीप जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत



केले. प्रमुख पाहुणे श्री. दत्तात्रय सातावळेकर, जिल्हा न्यायाधीश, सांगली (मूळ देवगड) व प्रमुख वक्ते श्री. श्रीप्रकाश कापडी, प्राचार्य वेदशाळा कवळे, गोवा (मूळ मालवण) यांचे हस्ते दीपप्रज्वलन व झाशीची राणी प्रतिमापूजन झाले. श्री. विनायक उमर्ये (सचिव) यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर खालीलप्रमाणे गुणगौरव करण्यात आला.

**१) विद्यार्थी गुणगौरव :** सन्मानचिन्ह, रोख रक्कम व पुष्प. कुमार सुमेघ गणपत्ये, कुमार वरद माईणकर, कुमार अथर्व देसाई (शिष्यवृत्ती प्राप्त सन २०१८), कुमारी प्रियांका डेगवेकर (सी.ए.) २०१८, कुमारी स्वप्ना जोशी एम्. टेक. फूड टेक्नॉलॉजी २०१९ (उच्चशिक्षित) या सर्वांचा गौरव करण्यात आला.



**२) उद्योगरती पुरस्कार :** सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल श्रीफळ, पुष्प, रोख रक्कम. श्री. विहंग देवस्थळी साधलेमेस सावंतवाडी यानी ठेव ठेवलेल्या रकमेच्या व्याजातून जिल्ह्यातील महिला उद्योजक प्रथम पुरस्कार श्रीमती मुंडले यांना प्रदान करण्यात आला.

**३) अन्य क्षेत्रातील पुरस्कार :** सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्प

१) श्री. पुष्कर कशाळीकर, २) श्री. डॉ. साईनाथ पित्रेः फ्रान्स खुली स्पर्धा सायकलिंगमध्ये प्रावीण्य प्राप्त. ३) श्री. सुधाकर जांभेकर : दांडपट्टा, तलवारबाजी व लाठी चालविणे कौशल्यप्राप्त. ४) श्री. बाजीराव जांभेकर : नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण. 'दर्पणकार जांभेकर यांचे कार्य' या विषयावर.

श्री. हेमंत निगुडकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. जिल्हाध्यक्षांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. श्री. सातावळेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या व्यवसायात शिस्त, सचोटी व अभ्यासूवृत्ती यांचे पालन करावे असे त्यानी आवाहन केले. श्री. कापडीगुरुजी यांनी आपले संस्कार, त्यामागील विज्ञान व त्याचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. शिवप्रसाद कोळंबेकर यांनी आभार प्रदर्शन केले. सौ. शिल्पा निगुडकर यानी सूत्रसंचालन केले. वंदे मातरम् झाल्यानंतर चहा व अल्पोपाहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

**श्री. वि. गो. उमर्ये**
सचिव सिंधुदुर्ग संघ

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली, जि. ठाणे.

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली आयोजित दि.२४.०३.२०१९ रोजी जनजागृतीविषयी कार्यक्रम स्वामी समर्थ



मंगल कार्यालय, अंबरनाथ येथे आयोजित करण्यात आला.

१. 'लवकर निदान देई जीवदान' व्याख्याते डॉ. अनिल हेरुर (कर्करोगतज्ज्ञ)
२. 'असेल दृष्टी तर पाहू सृष्टी' व्याख्याती डॉ. सौ. अनघा हेरुर (नेत्ररोगतज्ज्ञ)



दोघांची उत्कृष्ट व्याख्याने झाली.

उपस्थिती ८० जणांची होती. सकाळी १० ते १२ पर्यंत व्याख्याने व त्यानंतर ७० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

कार्यक्रम उत्तम झाला.



**डॉ. अभय कानेटकर**
कार्यवाह आरोग्य समिती.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई या संस्थेचे ९४ वे संक्रांत संमेलन रविवार, दि. २७ जानेवारी २०१९ रोजी सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाज सभागृह, दादर येथे आयोजित करण्यात आले होते.

मुरलीधर वेदपाठ शाळा, शीव येथील विद्यार्थ्यांनी म्हटलेल्या मंत्रघोषात गणेशपूजन व कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली.

सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध सनईवादक पंडित श्री. शैलेश भागवत, रत्नागिरी नगपलिकेचे नगराध्यक्ष श्री. राहुल पंडित व सुप्रसिद्ध साहित्यिक आणि कवी श्री. रविकिरण पराडकर हे उपस्थित होते. प्रमुख अतिथींना संघातर्फे 'कऱ्हाडे सन्मान' देऊन गौरवण्यात आले. श्री. उदय मनोहर चांदोरकर यांचा यशस्वी उद्योजक म्हणून गौरव करण्यात आला. श्री. घननिळ केशव दीक्षित यांस पौरोहित्य सन्मानाने गौरवण्यात आले. कऱ्हाडे गुणवंत म्हणून श्री. अविनाश रामचंद्र तांबे व कु. आभा अभय सरदेसाई यांचा सन्मान करण्यात आला. श्री. शेखर मावळंकर यांस उत्कृष्ट कार्यकर्ता हा सन्मान देण्यात आला. विवाहास ५० वर्षे झालेल्या १४ दांम्पत्यांचा या प्रसंगी यथोचित सन्मान करण्यात आला तसेच २५ गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांनाही स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघातर्फे दर वर्षी झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या नावाने ३ शालेय विद्यार्थिनींना त्यांच्या क्रीडाक्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार दिला जातो. तसेच शाळेला झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांची तसबीर व शाळेत मुलांसाठी वाटायला राणी लक्ष्मीबाईंची माहिती पुस्तिका देण्यात येते. या वर्षी हा पुरस्कार गिरगाव योथील चिकित्सक समूहाच्या शिरोळकर हायस्कूलमधील कु. प्रिया रेवाळे, कु. सानिया रक्ते व कु. जान्हवी लोखंडे या तीन मुलींना कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईचे अध्यक्ष श्री. श्रीराम देव, कार्याध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर व कार्यवाह श्री. हेमंत किर्लोस्कर यांच्या हस्ते देण्यात आला.




गुणवंत पुरस्कारप्राप्त श्री. अविनाश तांबे व कु. आभा सरदेसाई यांनी संघाचे आभार मानले. पौरोहित्य पुरस्काराने गौरवलेले ९३ वर्षीय श्री. घननिळ दीक्षित यांनी त्यांच्या खणखणीत आवाजात एक सूक्त म्हटले व सभागृहात पवित्र वातारण निर्माण केले.

श्री. उदय चांदोरकर यांनी सत्काराला उत्तर देताना 'ब्राह्मण व्यक्तींनी उद्योगाची कास धरावी' असे सांगितले व त्यांच्या सुरेल आवाजात एक गीत सादर करून सगळ्यांना मंत्रमुग्ध केले.

प्रमुख अतिथी श्री. राहुल पंडित यांनी ब्राह्मण समाजाने आक्रमकता दाखवावी व राजकारणात यावे, असे सुचविले. साहित्यकार व कवी श्री. रविकिरण पराडकर यांनी आपल्या पोलीस खात्यामधील नोकरीतील अनुभव विनोदी शैलीत खुसखुशीतपणे सांगितले आणि कार्यक्रमात चैतन्य आणले. त्यांनी त्यांच्या कविताही म्हणून दाखवल्या. त्यांना प्रेक्षकवर्गाने उत्स्फूर्तपणे दाद दिली. पंडित बिस्मिल्ला खाँन यांचे पट्टशिष्य सनईवादक पंडित शैलेंद्र भागवत यांनी त्यांच्या सत्काराचे उत्तर सनईवादनाच्या रूपाने सादर केले व मैफिलीत जान आणली. प्रेक्षकांच्या फर्माईश त्यांनी अतिशय बहारदारपणे पूर्ण केल्या.




संक्रात संमेलनाचे निवेदन व सूत्रसंचालन सौ. प्रीती किरकिरे यांनी अतिशय रंजकतेने केले.

संक्रात संमेलनास आलेल्या सर्व महिलांस हळदी-कुंकू देऊन संक्रांतीचे वाण लुटण्यात आले. कार्यक्रमानंतर सर्वांसाठी रुचकर भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने संक्रांत संमेलन यशस्वी झाले. सर्व प्रमुख अतिथी व उपस्थितांनी या सोहळ्याचे मनापासून कौतुक केले. तसेच संघाच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**हेमंत किर्लोस्कर**
**कार्यवाह**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा

'कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा' यांचे वतीने नववर्ष स्वागत व मकर संक्रांती निमित्त शनिवार दि ०९.०२.२०१९ रोजी सायंकाळी ६वा. रयत शिक्षण संस्थेमधील संस्कृतच्या प्राध्यापिका डॉ. उर्मिला आराणके यांचे 'सुखी माणसाचा सदरा' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान आयोजित केले होते. दिवंगतांना श्रद्धांजली वाहून उपस्थितांचे स्वागत केल्यानंतर श्री. बाळासाहेब भाटे यांनी अतिशय सुंदर प्रास्ताविक केले. त्यानंतर डॉ. आरणके यांनी जीवन सुखी होण्यासाठी आपण कसे असावे याचे अनेक छोट्या छोट्या गोष्टींमधून मनोरंजक विवेचन केले.




यासाठी नेहमी दुसऱ्याला आनंद दिला पाहिजे, इतरांबरोबर तुलना करू नका आणि नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवा असे मार्गदर्शन केले.

नंतर संघाचे अध्यक्ष श्री. अनिलराव काटदरे यांनी कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या कार्याविषयी माहिती दिली व संघाला अर्थिक मदत करण्यासाठी उपस्थितांना आवाहन केले. सुधीर करंबेळकर यांनी आभार मानले. शेवटी तिळगुळ वाटप व कॉफीपानाने कार्यक्रताची सांगता झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. किरकिरे, टिकेकर, फणसळकर इ. चे मोलाचे सहकार्य लाभले.'

अध्यक्ष कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सांगली

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सांगलीतर्फे तिळगूळ वाटप समारंभ रविवार, दि. १० फेब्रुवारी २०१९ रोजी सांगली गावभागातील ब्राह्मण नागरी पतसंस्थेच्या हॉलमध्ये दुपारी ४.३० वाजता आयोजित केला होता.

सांगली संघातर्फे प्रयत्न करूनही कार्यक्रम साजरे होत नव्हते, परंतु यंदा श्री. खांडेकर यांनी चंगच बांधला होता व त्याप्रमाणे कार्यक्रम साजरा झाला.

श्री. शरद खांडेकर यांनी उपस्थित लोकांचे स्वागत केले.

मध्यंतरीच्या कालावधीत जे कऱ्हाडे सभासद निधन पावले होते त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यानंतर श्री. खांडेकर यांनी थोडक्यात मागील आढावा व यापुढे जे कार्यक्रम नियमित करण्याचे ठरविले, त्याबद्दल माहिती दिली.

संघाच्या आर्थिक स्थितीबद्दल सांगितले व त्यासाठी सर्व कुटुंबांनी दर वर्षी रु. १००० प्रमाणे २ वर्षे देणगी द्यावी असे सुचविले. त्याला उपस्थितांनी पाठिंबा दर्शविला. यापुढे वर्षात ५ कार्यक्रमांचे आयोजन व त्यासाठी जास्तीत कऱ्हाडे बांधव उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न करण्याचे एकमताने ठरविले.

यानंतर सांगलीतील प्रसिद्ध डॉक्टर श्री. श्रीनिवास नाटेकर यांचा सिने संगीताचा कार्यक्रम झाला. त्यांनी रेकॉर्डेड गाणी व त्याबाबतची माहिती आपल्या शैलीत सादर केली. श्रोत्यांना त्यांनी मनमुराद आनंद दिला.

यानंतर श्री. तळेकर यांनी सर्वांचे आभार मानले.

उपस्थितांपैकी ज्यांच्या वयाची ८० वर्षे पूर्ण झाली आहेत. अशा सभासदांचा सत्कार करण्यात आला. सर्वांना तिळगूळाचे वाटप केले व अल्पोहारानंतर कार्यक्रम संपल्याचे जाहीर करण्यात आले.

श्री. शरद खांडेकर
९८२२९ ९५८९२

# कऱ्हाडा युथ क्लब आणि कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली

कऱ्हाडा युथ क्लब आणि कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्ट्राईक इट' ही कॅरम टुर्नामेंट १७ फेब्रुवारी २०१९ रोजी समाज मंदिर हॉल, डोंबिवली येथे घेण्यात आली. या टुर्नामेंट मध्ये ६५ जणांनी भाग घेतला होता.

डोंबिवली, ठाणे, गिरगाव, पुणे अशा ठिकाणांहून खेळण्यासाठी कऱ्हाडे एकत्र आले. पुरुषांच्या गटातून अनंत खांडेकरांनी ही टुर्नामेंट जिंकली, तर शरद सरपोतदार हे दुसऱ्या स्थानी होते. तसेच महिला गटातून स्मिता मोघे यांनी ही टुर्नामेंट जिंकली, तर छाया ओरपे या दुसऱ्या स्थानी होत्या. विजेत्यांना रोख रक्कम आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले, तर टुर्नामेंटमध्ये भाग घेणाऱ्या सदस्यांना सर्टिफिकेट देण्यात आले.

या टुर्नामेंटकरता डोंबिवली, ठाणे, गिरगाव संघांकडून सहकार्य लाभले तसेच डोंबिवली आणि ठाणे KBBF कडूनही मोलाचे सहकार्य लाभले. या टुर्नामेंटसाठी कौस्तुभ कळके, सी. एम. पुरोहित, राजीव प्रभुदेसाई, संजय अंबर्डेकर, सतीश नाख्ये, प्रकाश शेवडे, मकरंद देसाई, राकेश आंबेकर, सुजित मोघे यांच्याकडून आर्थिक पाठबळ मिळाले.

अशा उपक्रमांमार्फत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचून अनेक समाजोपयोगी उपक्रम करण्याचा कऱ्हाडा युथ क्लब चा मानस आहे.



(समोर बसलेले डावीकडून प्रसाद शेंबेकर, अनंत खांडेकर, क्षमा धामणकर, स्मिता मोघे, छाया ओरपे आणि मागे युवाची टीम.)



(KBBF डोंबिवलीचे अध्यक्ष प्रकाश जठार दीपप्रज्वलन करताना, समवेत क्षमा धामणकर, नितीन शेंबेकर, सुहास पंडित, प्रसन्न जनये, सुयश तांबे)



(KBS डोंबिवलीचे सरकार्यवाह नितीन शेंबेकर मनोगत व्यक्त करताना. स्टेजवर डावीकडून प्रसन्न जनये, KBS डोंबिवलीचे अध्यक्ष सुहास पंडित, KBBF डोंबिवलीचे अध्यक्ष प्रकाश जठार, क्षमा धामणकर.)

# कऱ्हाडे ब्राम्हण सेवा मंडळ डोंबिवली : महिला समिती व डोंबिवली पश्चिम कार्यकारिणी

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली : महिला समिती व डोंबिवली पश्चिम कार्यकारिणीतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित केला होता

कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष श्री. सुहासजी पंडित, उपाध्यक्षा व महिला समितीप्रमुख सौ. धामणकर, डोंबिवली पश्चिम कार्यकारिणी प्रमुख सौ. पद्मजा पुरोहित, कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. अस्मिता देशपांडे आणि सत्कारमूर्ती डॉ. सौ. मंजिरी घरत यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोजक्याच पण छान शब्दांत सौ. येल्लापूरकर यांनी केले. संस्थेचे प्रास्ताविक सौ. पुसाळकर यांनी केले.

या वेळी डॉ. सौ. मंजिरी घरत यांनी औषधांबद्दल बरीच महत्त्वपूर्ण माहिती दिली. औषधे कशी घ्यावीत, त्यांची एक्सपायरी तारीख कशी पाहून घ्यावी, डॉक्टरांच्या सल्ल्याने जी औषधे घ्यावयाची असतात, त्यांच्यावर कोणती खूण असते, ती खुण कशी ओळखावी आणि औषधांची देखभाल कशी करावी, याबद्दल अगदी साध्या व सोप्या शब्दात माहिती दिली.



सौ. अस्मिता देशपांडे यांनी या वेळी श्रीरामदासस्वामी यांच्या परम शिष्या श्री संत वेण्णास्वामी यांचा पूर्ण जीवनचरित्रपट प्रवचनाच्या माध्यमातून खूप उत्कृष्टरीत्या उलगडून सांगितला. शिष्य व गुरूचे नाते कसे असावे, निस्सीम भक्ती कशी असावी गुरूवरील अपार श्रद्धा, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तसेच मरणोत्तर भक्ती कशी असते, जीवनाच्या अतिशय कठीण परिस्थितीत गुरूंचे मिळालेले मार्गदर्शन त्यांना सर्वोच्च पदावर कसे घेऊन गेले, याबद्दलची माहिती साध्या, सहज खूप छान भाषेत



खूप छान पद्धतीने उलगडवून सांगितली.

अतिशय सुंदर असा हा कार्यक्रम उत्कृष्ट नियोजन पद्धतीने यशस्वीरीत्या पार पाडला.

कार्यक्रमाला महिलावर्गाची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**– अनघा बोंद्रे**

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली

**संक्रांत संमेलन–२०१९**

सालाबादप्रमाणे यंदाही संस्थेने भव्य-दिव्य अशा संक्रांत संमेलनाचे आयोजन केले. रविवार, दि. २०/०१/२०१९ रोजी समाजमंदिराच्या सभागृहामध्ये सायं. ४.३० ते ८.३० या वेळेत एक सुरेख आणि आखीव-रेखीव सभारंभ संपन्न झाला.

या कार्यक्रमाला राजापूर तालुक्यातील धूतपापेश्वरचे मा. रणजित आनंद पुराणिक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात वेदमूर्ती श्री. दत्तभार्गव महादेव मुरवणेगुरुजी व प्रसिद्ध शहनाईवादक श्री. शैलेश भागवत यांचा मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

याचबरोबर मा. डॉ. श्री. विजय शंकर धोंड्ये, मा. डॉ. श्री. आनंद हर्डीकर आणि आ. डॉ. श्री. राहुल आर. घाटवळ यांचा त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

दीपप्रज्वलन व गणेश स्तवनाने ४.३० वा. सुरू झालेल्या या कार्यक्रमाचे समापन सामुदायिक पसायदानाने झाले. सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन श्रीमती प्राची देवस्थळी, सौ. आसुरी येल्लापूरकर व सौ. रेवती धामणकर यांनी समर्थपणे सांभाळले.

मध्यंतरानंतर 'आयुष्य कसे जगावे' हे सांगणारे एक नॉन आध्यात्मिक प्रवचन ज्ञान, अध्यात्म, मनोरंजन आणि प्रबोधन यांचा अपूर्व संगम असलेला श्री. संजय उपाध्ये यांनी सादर केलेला 'मन करा रे प्रसन्न' हा कार्यक्रम आयोजित केला होता. Speed of The programme-60 Smiles per Hour असणाऱ्या या सुंदर कार्यक्रमाने प्रेक्षकांना २ तास हसवत खिळवून ठेवले. रसिक प्रेक्षकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त असा प्रचंड प्रतिसाद दिला.

सशुल्क भोजनाने समारंभाची मधूर सांगता झाली.

**सौ. माधुरी येल्लापूरकर**

– डोंबिवली पूर्व नगर कार्यकारिणी

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, मुलुंड

रविवार, दि. २० जानेवारी २०१९ या दिवशी संघाचा मकर संक्रांतीनिमित्त 'तिळगूळ समारंभ' संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या सन्माननीय सभासद सौ. नीलिमा तांबे, सौ. मधुश्री काकिर्डे, सौ. श्रुती सप्रे व श्री. उदय पत्की यांनी अत्यंत लोकप्रिय व बहारदार गाणी सादर केली. या कार्यक्रमास तबल्याची उत्तम साथ सन्माननीय सभासद श्री. रोहित नाटेकर यांनी, तसेच श्री. देशपांडे यांनी हार्मोनियमची अप्रतिम साथ करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. या कार्यक्रमाचे निवेदन सौ. अमृता सप्रे यांनी उत्तम प्रकारे केले. या भाव व भक्ती संगीताच्या कार्यक्रमास सभासदांचा खूप चांगला प्रतिसाद लाभला होता.


यानंतर संघाचे कार्यवाह श्री. श्रीपाद सप्रे यांनी नूतन सभासदांना परिचय करण्याकरिता आमंत्रित केले. यादरम्यान सर्वांना चहा-पान व तिळगूळ वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात संघाचे अध्यक्ष श्री. प्रमोद माईणकर व कार्यवाह श्री. श्रीपाद सप्रे यांनी सभासदांशी संवाद साधला. या वेळी त्यांच्याकडून सभासदांना संघाच्या कार्यभाराविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. त्यावर चर्चा होऊन सभासदांशी सुसंवाद साधला गेला. तसेच अध्यक्ष श्री. माईणकर यांनी कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या शैक्षणिक व वैद्यकीय मदतीच्या योजनाविषयी सविस्तर माहिती दिली. शेवटी सर्वांचे आभार मानून या कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रेषक : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड.**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक
# संक्रांत संमेलन २०१९- वृत्तांत

नाशिकच्या ऐन थंडीच्या मोसमात येणारे संक्रात संमेलन (तिळगूळ समारंभ) हा संघाच्या सर्व सदस्यांचा उत्साह द्विगुणित करणारा असतो. एक वर्षाआड एखादी एक दिवसाची कौटुंबिक सहल आणि एक वर्ष संगीत-व्याख्यान आयोजनाचा हा समारंभ.



संगीतातल्या बहुतेक प्रकारांना यापूर्वी संधी दिल्याने, तसेच वेगवेगळ्या विषयांवरही व्याख्याने आयोजित झाल्याने या वर्षी एक अनोखा विषय आम्ही निवडला होता. तो म्हणजे - कीर्तन.

सर्वांना माहीत आहेच की, सध्या अनेक तरुण-तरुणी वेगवेगळ्या कला शिकण्यासाठी धडपडत असतात परंतु कीर्तन ही कला शिकणारे तरुण-तरुणी फारच मर्यादित आहेत.

कु. रेणू रामदासी (नाशिक) या व्यवसायाने वकील असलेल्या तरुणीने आपल्या बालपणापासूनच कीर्तनकला आत्मसात करण्यात सुरुवात केली. 'रामदासी' या त्यांच्या घराण्यात 'रामदासी कीर्तन' ही पारंपरिक कला असली, तरी त्याचे शिक्षण प्रत्येकाने घेतले आहे असे नाही. रेणू रामदासी या मूळच्या नाशिकजवळील दिंडोरीच्या. दिडोंरीला त्यांचे अनेक वर्षांपासून राम मंदिर आहे. जेथे रामनवमीच्या उत्सवाव्यतिरिक्त वर्षभर धार्मिक कार्यक्रम चालू असतात. अशा या धार्मिक वातावरणात रेणू यांनी रामदासी कीर्तनाचे प्राथमिक धडे आपल्या आजोबांकडून आणि नंतर श्री क्षेत्र सज्जनगड येथे जाऊन घेतले. त्यानंतर पुढील शिक्षण ह.भ.प. वासुदेवबुवा बुरसे, पुणे यांचेकडे घेतले. रेणू रामदासी यांनी आजवर वेगवेगळ्या २०-२२ विषयांवर १२० ठिकाणी कीर्तने केली महाराष्ट्रात विविध ठिकाणी केली. तसेच झाशी, इंदौर, बेळगांव, तंजावर इ. ठिकाणी कीर्तनांचे कार्यक्रम केले आहेत.

आमच्या संघात झालेल्या कीर्तनाच्या आख्यानाचा विषय होता- 'आपली कऱ्हाडेभूषण राणी लक्ष्मीबाई.' पूर्वार्धात त्यांनी संत तुकारामांच्या एका अभंगावर पूर्वरंग सादर केला. उत्तरार्धात, १८५७ च्या स्वातंत्र्य समरातील राणीचा लढाऊ बाणा विशद करणारे हे कीर्तन ऐकताना सर्व सदस्य मंत्रमुग्ध झाले होते. रेणू रामदासी यांची विषय मांडण्याची शैली, त्यास यथोचित गायनाची संगत, खणखणीत आवाज आणि तबला, हार्मोनियमची सुसंगत साथ यामुळे हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.

उपस्थित ज्येष्ठ सदस्यांना अनेक वर्षांनी, तर तरुण सदस्यांना बहुधा प्रथमच हा कीर्तनप्रकार ऐकायला मिळाल्याने सर्वच सदस्यांनी या युवा कीर्तनकाराचे मनापासून कौतुक केले.

कीर्तनानंतर त्याच उल्हासित वातावरणातच सर्वांनी संक्रांत मेनू (कढी, खिचडी, बाजरीची भाकरी, वाग्यांचे भरीत, गुळाची पोळी) या स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला आणि प्रसन्न मनाने एकमेकांचा निरोप घेतला.

-नरेंद्र ताटके


With best compliments from...



MUKESH V. JOSHI

INSURANCE & INVESTMENT ADVISOR

CONTACT FOR

Life Insurance
Pension Planning
Mediclaim
Fire Insurance
Mutual Fund
Fixed Deposits

ADDRESS

"Shri Neelkamal" Anandpura, Nr. Govt. Press, Kothi Road, Vadodara-390 001

Ph.: 0265-2412812 Mobile : 098250 25006

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सोलापूर- गौरवदिन

महाराणी लक्ष्मीबाई जयंतीनिमित्त क.ब्रा. संघ, सोलापूरतर्फे गौरवदिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम येथील सेवासदन प्रशालेत यशस्वीरीत्या संपन्न झाला. या गौरवदिनानिमित्त इ. ५वी व ६वी विद्यार्थिनींसाठी 'धावणे'ची स्पर्धा घेतली. तर ७ वी च्या विद्यार्थिनींसाठी 'राणी लक्ष्मीबाई चरित्र' या विषयावर निबंध लेखन स्पर्धा घेतली.

**धावणे**

इ. ५वी अ १) कु. अनन्या रणपिसे
ब २) कु. प्रगती गायकवाड
इ. ६वी अ १) कु. श्रावणी चौगुले
ब २) कु. श्रावणी माने

चरित्रलेखन

अ १) कु. कीर्ती गायकवाड
ब २) कु. प्रतिमा लांबतुरे
३) कु. रिया सोनकांबळे

विजयी विद्यार्थिनींना मा. अध्यक्ष सविता ललित यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या कार्यक्रमानिमित्त प्रशालेला श्री. माईणकर यांच्या हस्ते 'झाशी राणीची प्रतिमा आणि चरित्रपर पुस्तके' भेट म्हणून देण्यात आली. या कार्यक्रमासाठी आम्हाला प्रशालेने अपेक्षेपेक्षा अधिक सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे नियोजन सौ. अंजली माईणकर यांनी केले.

**-सौ. अंजली माईणकर**
कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सोलापूर






# कऱ्हाडे ब्राह्मण संघ , पुणे

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेचा तिळगूळ समारंभ दि. ०२ फेब्रुवारी २०१९ रोजी पुण्याई मंगल कार्यालय, पौड रोड, पुणे येथे संपन्न झाला. 'परंपरेच्या पाऊलखुणा' ह्या सांस्कृतिक कार्यक्रमात पंडिता शमा भाटे संचालित नादरूप प्रस्तुत कथक नृत्य सादरीकरण व पंडित मिलिंद तुळाणकर यांचा जलतरंगाचा प्रेक्षणीय व श्रवणीय कार्यक्रम आणि त्यानंतर ७५ वर्षे पूर्ण ज्येष्ठ नागरिक सत्कार व भोजनोत्तर कार्यक्रम संपन्न झाला.

सुरुवातीस कार्यक्रमास उपस्थित सभासद व कुटुंबीय यांचे स्वागत विश्वस्त श्री. हेमंत हिर्लेकर आणि सचिव हेमंत पुराणिक यांनी तिळगूळ देऊन केले. झाशी राणी प्रतिमेस अध्यक्ष लक्ष्मीकांत देसाई व महासंघ सचिव गणेश गुर्जर यांनी पुष्पहार अर्पून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या रूपरेषेनुसार प्रथम सत्रात कंसाचे अत्याचार, कृष्णजन्म, माखन चोरी, राधा-कृष्ण, कालिया मर्दन, गोवर्धन पर्वत उचलणे ते कंसवध असे अनेक प्रसंग सर्व शिष्यांनी हावभाव व नृत्यातून अप्रतिम उभे केले. सर्व कार्यक्रमास लाईट इफेक्ट्सने खूप रंगत



आली.

यानंतर दुसऱ्या सत्रात पंडित मिलिंद तुळाणकर यांच्या जलतरंग कार्यक्रमास सुरुवात झाली. जलतरंगावर प्रथम 'जन गण मन' या राष्ट्रगीताच्या सादरीकरणाने सुरुवात करून नंतर राग किरवाणी व त्यावर आधारित गाणी त्यांनी सादर केली. अशा या विश्वविख्यात २ महान कलाकारांनी तिळगूळ समारंभ अविस्मरणीय केला.

यानंतर अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांनी २०१६-२०१९ या कालावधीत केलेल्या कामाचा आढावा घेताना संघाचे विविध उपक्रम, वैद्यकीय मदत रु.२०००००, शैक्षणिक मदत रु. १७५०००, शिष्यवृत्ती रु. २७५००० याची माहिती दिली व यासाठी संघाचे देणगीदार यांचे आभार मानले. पुण्याईचे श्री. गजानन पाध्ये यांचेही विशेष आभार मानले. तसेच संघात नवीन युवा भाग घेत आहेत, त्याबद्दल त्यांचेही कौतुक केले. यानंतर कु. मधुरा शेजवलकर हिने पंडिता शमा भाटे यांचा व विश्वस्त श्रीकांत गुर्जर


* नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा! * श्री. गणेश गुर्जर, पुणे

यांनी पंडित श्री. मिलिंद तुळाणकर यांचा परिचय करुन दिला. अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांच्या हस्ते दोघांचा स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.





सर्व ७५ वर्षे पूर्ण ज्येष्ठ नागरिक यांचा मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ, गुलाब फूल, पेढे व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर माधुरी करंबेळकर यांच्या सुरेल आवाजात पसायदानाने कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विश्वस्त सौ. मुक्ता चांदोरकर यांनी आपल्या ओघवत्या वाणीने अतिशय सुरेख केले. उपस्थित सर्वांनी उत्तम कार्यक्रम, नियोजन व भोजन अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली.

**लक्ष्मीकांत देसाई**

**अध्यक्ष, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे**

# विदर्भ संस्थेचीच अमरावती शाखा

रविवार, दि.२४ मार्च २०१९ ला श्रीरंग हिर्लेकरांच्या घरी आपल्या मंडळाची मासिक सभा आयोजित करण्यात आली. या वेळेस समाधानकारक उपस्थिती होती. अनेक मुद्यांवर चर्चा झाली.



१) विदर्भ संघाशी बोलणे करून आपली स्वतंत्र संस्था रजिस्टर करणे किंवा विदर्भ संस्थेचीच अमरावती शाखा म्हणून रजिस्टर करणे.

२) आपल्या कामाची व्याप्ती आता अमरावती जिल्ह्यापर्यंत वाढवणे.

३) सदस्यांनी आपापल्या घरच्या मंडळींच्या रक्तगटाची माहिती नोंद करणे. तसेच, वेळोवेळी आलेल्या कौटुंबिक अडचणी आणि आपल्या घरच्यांच्या कौतुकास्पद कामगिरीची माहिती ग्रुपवर देणे. सर्व ग्रुप अशा वेळेस एकमेकांच्या सुख-दुःखात एकत्र राहील

उदा. आज सौ. छाया भट -वेटलिफ्टिंग चॅम्पियन यांनी त्यांच्या अनेक यशांविषयी सांगितले. त्यांचे सर्वांनी कौतुक व अभिनंदन केले.

४) whatsapp वर लिहिताना आपली ओळख सर्वांना समजेल अशी व्यवस्था करणे.

५) विनाकारण इतर विषयांवरील माहिती, राजकीय आणि धार्मिक वादग्रस्त चर्चा copy paste, forward चे प्रमाण मर्यादित ठेवणे.

६) प्रत्येक सभेत एका सदस्याने त्याच्या आवडीच्या विषयावर उद्‌बोधक माहिती देणे.

उदा. आज सौ. मृणाल म. पातकर यांनी त्या करत असलेल्या उपयुक्त अशा brain mapping पद्धतीविषयी सांगितले. त्यांचे अभिनंदन.

७) दिवाळीनंतर आपल्या ग्रुपची सहल 'हेमलकसा' येथे नेण्याचा विचार आहे. त्या दृष्टीने सौ. आरती नानकर (श्री. प्रकाश आमटेंची कन्या) यांनी प्राथमिक माहिती दिली.

८) पुढील सभा 'श्री रघुनंदन भट' यांच्या घरी दि. १४ एप्रिलला घेणे.

**आज उपस्थित :**

श्री. विजय खांडेकर
श्री. व सौ. टेंब्ये
श्रीमती सुषमा हिर्लेकर
श्री. व सौ. अनिल पुरोहित
श्री. व सौ. काका पुरोहित
श्री. व सौ. मोहन पुरोहित
सौ. मृणाल म. पातकर
श्री. व सौ. हरिहर हिर्लेकर
श्री. वसंत हिर्लेकर
श्री. तात्याकाका हिर्लेकर
श्री. व सौ. श्रीरंग हिर्लेकर
श्री. व सौ. आंबेकर
श्री. व सौ. रघूनंदन भट



# रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघ मर्यादित, रत्नागिरी
## वसतिगृहात कॅरम खोलीचे उद्घाटन

रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघामार्फत ना नफा – ना तोटा या तत्त्वावर विद्यार्थी वसतिगृह चालवण्यात येते. वसतिगृहामध्ये ३० विद्यार्थ्यांची सोय आहे. या वर्षी १९ विद्यार्थी वास्तव्याला होते. प्रत्येक विद्यार्थ्याला सिंगल कॉट, टेबल-खुर्ची, लॉकर अशा सुविधा आहेतच. विरंगुळ्यासाठी मुले संघाच्या पटांगणात मैदानी खेळ खेळतात. या वर्षी मुलांना बैठे खेळ खेळता यावेत याकरिता के. जी. एन. सरस्वती फाउंडेशनतर्फे २ कॅरम बोर्ड देणगी म्हणून देण्यात आले. सदर खोलीचा उद्घाटन कार्यक्रम दि. १७.०३.२०१९ रोजी सकाळी १० वाजता संपन्न झाला. संघाचे अध्यक्ष श्री. हिर्लेकर सर यांनी वसतिगृहातील उपक्रमांची त्याचप्रमाणे देणगीबद्दल उपस्थितांना माहिती दिली. यानंतर श्री.हिर्लेकर सर, श्री. हळबे सर यांनी उद्घाटन करुन खेळाचा आनंद घेतला. विशेष सोय दिल्यामुळे विद्यार्थी फार खुश होते.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री. माधव हिर्लेकर, उपाध्यक्ष श्री. मिलिंद आठल्ये, कमिटी मेंबर श्री. चंद्रकांत हळबे, सौ. प्रतिभा प्रभुदेसाई त्याचप्रमाणे के. जी. एन. सरस्वती तर्फे उपाध्यक्ष डॉ. शरद प्रभुदेसाई व कमिटी मेंबर डॉ. श्रीकृष्ण जोशी व वसतिगृहातील विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या वतीने श्री. ओंकार पेंढारकर याने सर्वांचे आभार मानले. यानंतर सर्वांनी कॉफीचा आस्वाद घेतला व अतिशय प्रसन्न वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

**श्री. माधव भास्कर हिर्लेकर**
**अध्यक्ष**




# जी. व्ही. गणपत्ये
# केमोक्रॅट्स सेल्स्

**फायबरग्लास रॉ मटेरिअल,**
**इपॉक्सी रेझिन्स, पॉलियुरेथिन रेझिन्स इपॉक्सीपुटीज (एम-सील)**
**लॅमिनेशन मटेरिअल, प्लायवूड बोर्ड्स**
**मिळण्याचे एकमेव ठिकाण.**

जोगेश्वरी मंदिरासमोरील गल्ली, वाघ चेंबर्स, ६४५, बुधवार पेठ,
सकाळ ऑफिसजवळ, पुणे – ४११ ००२.
ऑफिस (०२०) २४४५२११०, २४४५९८३४ मो. ९८२२० २४२१०

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदा

बडोद्याच्या प्रसिद्ध महालक्ष्मी मंदिरात रविवार, दि. २० जानेवारी २०१९ रोजी सालाबादप्रमाणे तिळगूळ समारंभ साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत ४० वर्षांवरील स्त्री व पुरुष सभासदांसाठी बास्केटबॉल स्पर्धा आयोजित केली होती. त्यात ३५ सभासदांनी भाग घेतला. त्यानंतर वय वर्षे ७५ पूर्ण झालेल्या श्री. नरेंन्द्र ह. पानवलकर, श्री. जयंत भि. तांबे, श्री. मधुकर पंडित व श्री. प्र. द. नवाथे यांचा भेटवस्तू, पुष्पगुच्छ व मिठाईचा पुडा देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ज्यांच्या लग्नाला ६३ वर्षे झालेली आहेत असे जाडपे श्री. श्रीराम आठल्ये व सौ. शैलजा आठल्ये यांचाही शुभेच्छा व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर महिलांना हळदी-कुंकू व हलावा देण्यात आला आणि मग सर्व उपस्थितांना तिळगूळ व अल्पोपाहार देऊन कार्यक्रम संपन्न झाला.

## एक दिवसाची सहलः कांवी कंबोई, स्थंभेश्वर महादेव

दर वर्षीप्रमाणे ह्या वर्षी पण आपल्या संघाने सहलीचे आयोजन केले होते. ह्या वेळी सहल ठरल्याप्रमाणे रविवार, दि. ३ फेब्रुवारीला सकाळी ६.४५ वाजता मार्केट रस्त्याहून बस निघाली. दोन-तीन ठिकाणाहून प्रवासी घेऊन श्री. रवींद्र बाकरे ह्यांच्या दोन गाड्यांसह एकूण ६६ प्रवासी घेऊन सकाळी ८.१५ वाजता महुवडला पोहोचलो. तेथे दर्शन करून एकमेकांचा हसत-खेळत परिचय करून घेतला आणि झकास नाश्ता व चहा-कॉफीचा आस्वाद घेतला. महुवड येथे आपले सभासद श्री. श्रीपाद आमटे ह्यांचे नातेवाईक श्री. साठेबंधूंनी खूपच छान सोय केली, त्याबद्दल त्या सर्वांना मनापासून धन्यवाद.

महुवडहून १० वाजता निघून ११.३० वाजता कांवी-कंबोई येथील समुद्रतटावर असलेल्या स्थभेश्वर महादेव येथे पोहोचलो. दर्शन झाल्यानंतर सर्व सभासदांनी संगीत खुर्ची, लिंबू-चमचा, Clap at 7 वगैरे मजेशीर खेळ खेळले. सर्वांनी उत्साहाने भाग घेतला.

दुपारी २ वाजता चारीठाव सुग्रास भोजन झाले. त्यानंतर हाऊजीचा खेळ झाला. मग मंदिरात समुद्राच्या भरतीचे पाणी पाहण्याची मजा घेतली. सायं. ५.३० वाजता चहा-कॉफी घेऊन परतीच्या प्रवासाला निघालो आणि ७.१५ ला रणू येथील तुळजाभवानीच्या मंदिरात पोहोचलो. बाकरे कुटुंबाने तेथे आधी जाऊन ट्रस्टची परवानगी घेऊन ठेवल्यामुळे उत्तम सोय झाली.

जेवण तयार होईपर्यंत दर्शन झाल्यावर पुन्हा खेळ घेतले. हॉर्स रेस, २ मिनिटांत जास्तीत जास्त म्हणी सांगणे, १० मिनिटांत छापील १६ प्रश्नांची उत्तरे लिहिणे. सर्वांनी मजा केली. रात्री ९.०० वाजता मस्त खिचडी, भजी व कढी असे जेवण घेऊन बडोद्यास परतलो.

## रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघ मर्यादित, रत्नागिरी
### संघातर्फे हृद्य सत्कार

७५ वर्षांच्या सुखी वैवाहिक जीवनाप्रमाणेच आध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या १०२ वर्षांचे श्री. विष्णू तथा तात्या मास्तर तांबे व ९२ वर्षांच्या सौ. निर्मला तांबे या खेडकुळी येथील दांम्पत्याचा सत्कार रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे अध्यक्ष श्री. माधव हिर्लेकर यांच्या हस्ते माघी गणेश जयंतीच्या दिवशी करण्यात आला. श्री. तांबे गुरुजींना गणपती मूर्ती व शाल भेट देण्यात आली. श्रीगुरू बालाजी तांबे यांचे ते काका आहेत. अत्यंत मोठा परिवार असणाऱ्या या दांम्पत्याने गेली ५० वर्षे माघी उत्सव चालू ठेवला व आजही येणाऱ्या-जाणाऱ्यांची आपुलकीने चौकशी करतात.



याच प्रसंगी संघाने श्रीगुरू बालाजी तांबे व सौ. वीणा तांबे यांचाही सत्कार केला. संघाचे अध्यक्ष श्री. माधव हिर्लेकर यांनी उपस्थितांना संघाच्या कार्याची माहिती दिली. पुढील वर्षी संघाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची विनंती केल्यावर श्रीगुरूंनी होकार दिला.

या प्रसंगी श्री. चंद्रकांत हळबे, श्री. दिलीप ढवळे, श्री. मानस देसाई, सौ. नीलम हिर्लेकर, सौ, गीता ढवळे, कु. शर्वाणी ढवळे, श्रीमती वंदना देसाई आदी उपस्थित होते. सत्कारानंतर आरत्यांचा कार्यक्रम झाला व उपस्थितांनी प्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम प्रसन्न वातावरणात पार पडला.

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची या वर्षातील ३री सभा बंगलोर येथे दि. ९/३/२०१९ रोजी झाली. ही सभा महासंघाच्या इतिहासात प्रथमच दक्षिण भारतातील संघांना सभेस उपस्थित राहता यावे या हेतूने आणि बंगलोर कऱ्हाडा ब्राह्मण समाजाच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आली होती. या सभेस आगलपाडी, म्हैसूर, कऱ्हाडा ब्राह्मण समाज, बंगलोर आणि कऱ्हाडे मित्र मंडळ, बंगलोर दक्षिण भारतातील संघ उपस्थित होते. गुजरातमधील बडोदा संघ, माहाराष्ट्रातील नाशिक, मुंबई, नागपूर, रत्नागिरी, सावंतवाडी, ठाणे, डोंबिवली या संघांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महासंघाचे सचिव श्री. गणेश गुर्जर हे प्रतिनिधी उपस्थित होते.

सर्व प्रथम सर्व उपस्थितांचे स्वागत कऱ्हाडा समाजाचे अध्यक्ष मा. श्री. मंजुनाथ भट यांनी केले आणि सभेचे कामकाज सुरू झाले. सर्वप्रथम दीपप्रज्वलन झाले आणि सर्व उपस्थितांनी आपापला परिचय करून दिला. महासंघाच्या नेहमीच्या पद्धतीनुसार ज्ञातीमधील दिवंगत सदस्यांना आणि पुलवामा येथे नुकत्याच झालेल्या हल्यामधील शहीद जवानांना २ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय अंबर्डेकर हे प्रकृती अस्वास्थ्यतेमुळे आले नाहीत. परंतु या सभेसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या होत्या.

महासंघाचे उपाध्यक्ष श्री. नागराज उप्पंगला यांनी सर्वप्रथम उपस्थितांचे स्वागत करून विषयसूचीनुसार कामकाजास सुरुवात केली. प्रथम विषयाप्रमाणे मागील दि. २३ डिसेंबर २०१८ रोजी डोंबिवली येथे झालेल्या सभेमध्ये जे ठराव झाले, ते वाचून दाखवले आणि त्यास सर्वानुमते मंजुरी दिली. त्यानंतर महासंघाचे कोषाध्यक्ष श्री. संजय अंबर्डेकर ह्यांनी श्री. गणेश गुर्जर- सचिव यांनी ऑक्टोबर ते फेब्रुवारी २०१९ पर्यंतचे हिशोब ते उपस्थित राहणार. नसल्याने सादर करावेत, अशी विनंती केली. त्यानुसार श्री. गणेश गुर्जर यांनी हिशोब सादर केले आणि त्यावर चर्चा झल्यावर सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. मागील सभेप्रमाणेच या कालावधीचे अंतर्गत लेखापरीक्षण श्री. रायकर यांनी केले. त्याचा अहवाल नागपूर संघाचे सचिव श्री. श्रीरंग माईणकर यांनी वाचून दाखवला आणि त्यास मंजुरी दिली. आयत्या वेळच्या विषयामध्ये श्री. गणेश गुर्जर यांनी महासंघातर्फे वैद्यकीय व शैक्षणिक मदत याबद्दल माहिती दिली आणि या वर्षी २० जणांना ही मदत दिल्याचे जाहीर केले यासंदर्भात श्री. नागराज, उपाध्यक्ष यांनी असे सांगितले की, महासंघास जे.डी. डीडंड मिळते, त्याबद्दल माहिती असतेच त्यानुसार प्रत्येक संघाने दोन अर्ज डिसेंबर पूर्वी पाठवावेत. आणि त्याचबरोबर सर्व कागदपत्रे तपासून त्या-त्या संघानी संघामार्फत मदत देऊन शिफारीशीसह पाठवावेत. डिसेंबरनंतर कोणत्याही संघाने अर्ज पाठवू नयेत. यावर उपस्थितांनी आपले विचार मांडले. काही संघांकडे याबाबत कोणतीही तरतूद नाही, त्यामुळे ते संघ त्यांच्याकडून मदत देऊ शकत नाहीत. त्यासाठी प्रत्येकाने संघाने आपल्या संघात तशी तरतूद करावी.

बंगलोर येथे ज्या अर्जदारांना महासंघातर्फे मदत देण्यात येणार होती, तो कार्यक्रम दि. १०/०३/२०१९ वर्धापन दिनाच्या कार्यक्रमांत करावा असे ठरले. सर्वांचे आभार मानून सचिव यांनी सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले.

दि. १०/३/१९ रोजी वर्धापनदिनाच्या दिवशी महासंघाचे सचिव यांचे हस्ते वैद्यकीय मदत रु. ६००००/- आणि शैक्षणिक मदत रु. ३००००/- असे एकूण रु. ९००००/- चे वाटप करण्यात आले. त्यांनतर महासंघाचा बंगलोर संघाने पुष्पगुच्छ, शाल फळांची करंडी देऊन सन्मान केला. महासंघाच्या वतीने हा सन्मान श्री. गणेश गुर्जर- सचिव यांनी स्वीकारला. यानंतर विविध गुणदर्शन, विविध स्पर्धांच्या विजयी सभासदांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी बंगलूर येथील डॉक्टर्स, वैज्ञानिक आणि शैक्षणिक क्षेत्रांत उत्तम कार्य केलेल्यांचाही सत्कार करण्यात आला.

बंगलोर संघाने महाराष्ट्र आणि गुजरात मधून आलेल्या प्रतिनिधींचा त्यांच्या कार्यकारिणी सदस्यांचे घरी करून एक उत्तम उदाहरण प्रस्तुत केले. कार्यक्रमाची उत्तम व्यवस्था ठेवल्याबद्दल बंगलोर संघाप्रति श्री. गणेश गुर्जर यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

**श्री. गणेश गुर्जर,**
सचिव, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

# असंही होऊ शकतं?

श्रीरंग हिर्लेकर, अमरावती.
मो. ९४२२१११८९३.

मी आज तुम्हाला अशा एका आपल्या बहिणीची ओळख करून देणार आहे की, तिच्याविषयी वाचल्यावर तुमच्या मनात अगदी सहज प्रश्न निर्माण होईल असंही होऊ शकतं? ही महिला म्हणजे सौ. छाया रघुनंदन भट. ही महिला आपल्या अमरावतीचीची. कदाचित यांचे कर्तृत्व कित्येक जणांपर्यंत पोहोचलेही असेल परंतु ज्यांच्यापर्यंत पोहोचले नाही त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी, त्यांना धैर्य व बळ देण्यासाठी हा माझा प्रयत्न.

छाया भट ह्या फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया येथे कार्यरत आहेत आणि विशेष म्हणजे त्या एक उत्कृष्ट खेळाडू आहेत. त्यांनी विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन अनेक प्रकारची मेडल्स जिंकली आहेत. त्या मूळच्या भोपाळच्या. त्या काळी मुलींनी खेळात भाग घेऊन पुढे येणे वगैरे समाजमान्यच नव्हते. पण आपल्या मुलीवर अशी वेळ येऊ नये. तिला सर्व काही करता यावे यासाठी त्यांच्या आईने पूर्ण काळजी घेतली. लग्नानंतर त्या आपल्या सासरी म्हणजे भटांकडे आल्या आणि त्यांना अगदी पोषक वातावरण मिळाले. घरातून प्रेरणा व प्रोत्साहनच सतत मिळत गेले. त्यांना विक्रमादित्य पुरस्कार, सर्वोत्कृष्ट खेळाडू, विद्यापीठाचे सतत ३ वर्षे, प्रतिनिधित्व विद्यापीठाच्या प्रमुख, उत्कृष्ट विद्यार्थी ॲवॉर्ड, २६ पेक्षा जास्त नॅशनल स्पर्धा त्या १९८५ ते १९९५ या काळात खेळल्या व अधिकाधिक पदके प्राप्त केली.

एवढी कारकीर्द पार पडल्यानंतर त्या पॉवरलिफ्टिंग या खेळाकडे वळाल्या. त्यातही त्यांनी आपला ठसा उमटवला. प्रथमच त्यांनी एशियन पॉवरलिफ्टिंग १९९३ मध्ये सहभागी होऊन (चायनीज तैपेई) ४ रौप्य पदके प्राप्त केली केली. खरे तर पॉवरलिफ्टिंग म्हणजे मर्दानी खेळ म्हणून ओळखला जातो. पण त्यातही त्यांनी माघार न घेता कठोर परिश्रम, जिद्द आणि थोरांचे आशीर्वाद ठेवून आपला प्रवास सुरूच ठेवला.

छायाताईंचा इतका यशस्वी प्रवास सुरू असताना त्यांना अचानक एका दुर्धर आजाराला सामोरे जावे लागले. तो आजार म्हणजे कर्करोग. त्यांना आतड्यांचा कर्करोग जडला होता आणि



तोही तिसऱ्या पायरीवरचा. हे जेव्हा प्रथमच छायाताईना कळले, तेव्हा त्यांच्या डोक्यात एकच विचार शिरला का जगायचे? मात्र त्यांच्या मुलांचे चेहरे त्यांच्या डोळ्यांपुढे आले आणि त्यांनी ठरवले की, पुढचा प्रत्येक दिवस मी चांगलाच जगणार आणि मीच माझ्या शरीराला आदेश देईन, 'मी उत्तम आहे, मला चांगले जगायचे आहे.' डॉक्टरांनी त्यांना फक्त पाच वर्षे दिली होती पण त्यांनी अगदी स्पष्ट स्वतःशी ठरविले मी माझा येणारा प्रत्येक दिवस चांगला घालविणार.

डॉक्टरांनी त्यांना सांगितले, आता खेळाचा सराव बंद, तुमचे आयुष्य आमच्यासाठी जास्त महत्त्वाचे आहे. बाकी इतर नातेवाइकांनीसुद्धा त्यांना खेळाला विरोधच केला. पण घरच्यांनी मात्र त्यांना साभाळूनच घेतले, समजावून घेतले आणि त्यांच्या मनाप्रमाणे त्यांना उर्वरित आयुष्य जगू द्यावे, असा निर्णय घेतला. मग पुन्हा त्यांचा सराव सुरू झाला

त्याच्या इयत्ता ४ थी व ६वीत असणाऱ्या मुलांनीसुद्धा 'आई, तू आजारी आहेस' असे कधीही जाणवू दिले नाही. आणि त्या स्वतःपण आपल्या शरीराला सतत आदेश देत असत की मला काहीही झालेले नाही. मी एकदम फिट आहे. त्यांना २०१२ मध्ये कॅन्सर असल्याचे कळले, त्या २०१४ मध्ये त्यातून बाहेर पडल्या व आपल्या प्रवासाला त्यांनी पुन्हा सुरुवात केली. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आपली काळजी घेत गेल्या आणि २०१४ ते २०१७ या काळात त्यांनी अनेक पदके राष्ट्रीय स्तरावर प्राप्त केली. सन २०१८ मध्ये त्यांनी नॅशनल बेंच प्रेस पॉवर लिफ्टिंग चॅम्पियनशिप रांची येथे झालेल्या स्पर्धेत भारतासाठी ब्राँझ मेडल मिळविले हे मेडल मिळविल्यानंतर त्यांना जो आनंद मिळाला तो म्हणजे- आपण जीवन जगलो, हरलो नाही. त्यांना स्वतःचाच अभिमान वाटायला लागला. त्यांनी यापूर्वीही अनेक राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय स्तरावरील पदके मिळवली होती.

पण कॅन्सरवर मात करून घेतलेल्या पदकाचा आनंदच काही वेगळा!

त्या सर्व कर्करोगरुग्णांना सांगतात. घाबरून जायचे नाही, आपल्या आजाराचा बाऊ करायचा नाही आणि आपणच स्वतःला सतत सांगत राहायचे, मी एकदम तंदुरुस्त आहे. मला काहीही झालेले नाही. तेव्हा तुम्ही नक्कीच जिंकू शकता. छायाताई तुम्ही सर्वांसाठी प्रेरणा आहात. तुम्ही सर्वांसाठी आदर्श आहात. सलाम तुमच्या या कर्तृत्वाला. ही हिरकणी आपल्या अमरावतीची, म्हणून आम्हा सर्व अमरावतीकरांना तिचा अभिमान.

## राजेश पेंढारकर महाराष्ट्र क्षेत्राचे प्रमुख

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

सागरी संरक्षण अधिक सक्षम करण्यासाठी नौदलाने ऑपरेशनचा आवाका वाढवला आहे. त्यासाठी महाराष्ट्र व गुजरात क्षेत्र प्रशासकीयदृष्ट्या वेगळे केले आहे. त्याअंतर्गत रिअर ॲडमिरल राजेश पेंढारकर यांनी सोमवारी महाराष्ट्र क्षेत्राचे प्रमुख या नात्याने पदभार स्वीकारला.

अरबी समुद्रावर वर्चस्व ठेवणारा पश्चिम कमांड हा नौदलातील सर्वाधिक महत्त्वाचा आहे. सामरिकदृष्ट्या या कमांडचे महत्त्व अपार आहे. यामुळेच पश्चिम कमांड ऑपरेशनचा नौदलाने विस्तार केला आहे.

मुंबईत मुख्यालय असलेल्या पश्चिम कमांडचे गोवा व कर्नाटक राज्यासाठी स्वतंत्र क्षेत्र आहे. पण महाराष्ट्र व गुजरातसाठी संयुक्त क्षेत्र होते. आता मात्र महाराष्ट्र व गुजरात हे प्रशासकीयदृष्ट्या वेगळे झाले आहे. नौदलाने गुजरातमधील पोरबंदर येथील हवाईतळाचा विस्तार केला.

बाजूकडील बातमी नाशिक कऱ्हाडे ब्राह्मण संघाकडून पाठविण्यात आली.

श्री. नरेंद्र ताटके
क. ब्रा. संघ नाशिक



श्रीमती काटदरे यांचा शतकपूर्ती निमित्ताने सत्कार करताना कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई व अन्य पदाधिकारी.



# यशोगाथा : श्री. विवेक नानिवडेकर

शब्दांकन : सौ. मेघा नाटेकर
मो. : ९६३७१ ५५९४८

नमस्कार. आज मी जरी एका कंपनीचा संचालक (Director) असलो, तरी इतरांप्रमाणेच अत्यंत गरिबीत माझे लहानपण गेले. आम्ही मूळचे कोकणातील वैभवाडीजवळच्या नानिवडे गावचे. आमचं मूळ आडनाव महाजनी. पहिल्या शाहूमहाराजांनी आमच्या पूर्वजांना नानिवडे हे गाव वतन म्हणून दिलं आणि तिथून पुढे ननिवडेकरांचा वंशवृक्ष बहरत गेला. माझे वडील मिलिटरीमध्ये होते. दुसऱ्या महायुद्धात लढले होते. त्या वेळी त्यांनी बगदाद येथे काढलेला त्यांचा फोटो आजही माझ्या घरी आहे. दुर्दैवाने माझ्या वडिलांच्या वयाच्या दहाव्या वर्षी त्यांचे आई-वडील दोघेही वारले त्यामुळे दहाव्या वर्षीच माझे वडील कै. राजाराम नानिवडेकर हे गावातून बाहेर पडले. कोल्हापुरात खांडेकर म्हणून गृहस्थ होते. त्यांच्या घरातील कामे करून माझ्या वडिलांनी शिक्षण घेतले आणि मॅट्रिकची परीक्षा पास होऊन ते मिलिटरीमध्ये रुजू झाले. त्यामुळे ते सतत फिरतीवरच असत. त्यांनी त्यांचे कुटुंब पुण्यात ठेवले होते.

त्यामुळे माझा जन्म, शिक्षण सगळे पुण्यातच झाले. मला ३ बहिणी. २ मोठ्या व १ लहान. शुक्रवार पेठेत दोन खोल्यांच्या घरात आम्ही राहत असू. वडील बाहेरच असल्याने आईच घरातील सर्व काही पाहत होती. आजही मला आठवतं की, आम्ही राहत होतो त्या वाड्यात आजूबाजूला मोजून ३ ते ४ ब्राह्मण कुटुंबे होती. त्यामुळे सुरुवातीला आम्हाला खूप त्रास दिला. पण मी जसा मोठा होत गेलो तसा तो त्रास कमी झाला.

नंतर मी इंजिनिअर झालो मेकॅनिकलमध्ये डिप्लोमा घेतला. त्यानंतर पहिली नोकरी लागली ती इलेक्ट्रॉनिका ह्या कंपनीत. तिथे मी ट्रेनी इंजिनिअर म्हणून रुजू झालो. नोकरी करत असतानाच part time 'DBM' चा कोर्स केला. १९७८ पासून मी इलेक्ट्रॉनिकामध्ये वाटचाल करत २०१२ पर्यंत मी तिथेच होतो. नंतर कंपनीचा Associate Vice Pesident of National Business झालो. माझं सगळ करिअर इलेक्ट्रॉनिकामध्येच




घडलं. १९७८ मध्ये जेव्हा मी रुजू झालो, तेव्हा इलेक्ट्रॉनिका ही लहान कंपनी होती. नंतर ती मोठी झाली. त्या कंपनीची प्रगती होत असताना मी त्यातील एक भाग होतो. कंपनीची प्रगती, वाटचाल मला जवळून पाहता आली. अनुभवता आली. त्यातूनच खूप काही शिकायला मिळालं.

इलेक्ट्रॉनिकामध्ये मी प्रथम ट्रेनी इंजिनिअर म्हणून होतो, मग shop ला आलो. त्यानंतर मॅन्युफॅक्चरिंग, sells, R&D, Marketing ला आलो. त्या वेळी इलेक्ट्रॉनिकाने परदेशी बाजारपेठेतील संधी पडताळून पाहावयाचे ठरवले. ती गोष्ट आहे १९८८-८९ मधील आणि ह्या कामगिरीसाठी मला निवडले गेले. तेव्हापासून परदेशी बाजारपेठेतील Sell च्या निमित्ताने माझा प्रवास सुरू झाला. सुरुवातीला शेजारील देशांतील संधींचा विचार केला. त्यानंतर सिंगापूर, मलेशिया येथील व्यावसायिकांना भेटलो. त्यांचे अभिप्राय घेतले. त्याप्रमाणे आमच्या उत्पादनांमध्ये आवश्यक बदल करून आम्ही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पाऊल टाकले. १९८८-८९ पासून सुरू असणारा प्रवास २००७-०८ पर्यंत अखंड सुरूच होता. सुरुवातीच्या काळात वर्षातील ४-५ महिने मी बाहेरच असायचो. त्या वेळी वेळेचं बंधन नव्हतं. कंपनी लहान आहे व ती मोठी करायची, एवढं एकच ध्येय होतं. स्वतःचीच कंपनी असल्यासारखं आम्ही काम करायचो. त्यामुळे इतर गोष्टी आमच्यासाठी दुय्यमच होत्या. पूर्वपुण्याई कुठे तरी कामाला येते, असं म्हणतात. त्याप्रमाणे इलेक्ट्रॉनिकामध्ये जे जीव ओतून काम केलं, त्या वेळी कंपनीच्या माध्यमातून जो संपर्क झाला होता, त्यातूनच FibroIndia ची संधी चालून आली. ही जर्मन कंपनी असून त्यांना भारतात स्वतःचे उत्पादन सुरू करायचे होते आणि त्यासाठी ही कंपनी योग्य व्यक्तीच्या शोधात होती. तिथे माझे नाव सुचवलं गेलं. जानेवारी २०१३ मध्ये मी तिथे काम सुरू केलं. मार्च २०१३ मध्ये कंपनीची (Turnover) वार्षिक उलाढाल ११.२५ कोटी होती, आता मार्च २०१९ मध्ये ती ५५ कोटींच्या घरात पोहोचली आहे आणि १०० कोटींच्या पुढे जाण्याचे आमचे ध्येय आहे. त्यामुळेच कंपनीचे जर्मनीतील संचालक खुश आहेत. त्यांना नवा हुरूप आला आहे. म्हणूनच कंपनीच्या चाकण येथील फॅक्टरीमध्ये ते अजून नव्याने

गुंतवणूक करत आहेत. नुकतेच कंपनीच्या दुसऱ्या परिसराचे (Campus) चे उद्घाटन करण्यात आले. आम्ही (Fibro India) कमी खर्चात जर्मन मेजरमेंट तयार करतो. ते Fibro च्या Dealer ना पुरवतो. तसेच भारतभर विक्री करतो.

या सगळ्या व्यापात खऱ्या अर्थाने माझ्या पाठीशी उभी राहिली ती माझी पत्नी मंजिरी. आमचं लग्न १६ मार्च १९८५ रोजी झालं. त्या वेळी ती महाराष्ट्र बँकेत नोकरी करत होती आणि १९८८-८९ पासून माझी फिरती सुरू झाली. त्यानंतर माझा संसार सांभाळला तो मंजिरीनेच. नोकरी करून, घरचं सांभाळून मुलींनाही तिनं मोठं केलं. मी एकदा कामानिमित्त बाहेर गेलो की, महिन्यातले २ ते ३ आठवडे बाहेरच असायचो. पण मंजिरीमुळे मला घरची काळजी नसे. आम्हाला २ मुली. मोठी मुलगी सध्या अमेरिकेत असते. तिचं लग्न २०११ मध्ये झालं आणि लहान मुलगी सध्या आर्किटेक्चरचे शिक्षण घेत असून शेवटच्या वर्षाला आहे. आता माझा नातूसुद्धा १ वर्षाचा झाला आहे. मी सुखी-समाधानी आहे. वडीलांच्या लढवय्या स्वभावाच्या संस्कारांमुळे येणाऱ्या अडचणींवर मात करत गेलो. यशाची शिखरे पार करत गेलो. पण ही आपली कंपनी आहे, तिला मोठं करायचं आहे हा विचार मात्र आजही कायम आहे.

## मूली खाने से होने वाले फायदे



१) रोजाना सुबह खाने में मूली का सेवन करने से डायबिटीज से जल्द छुटकारा मिलता है।

२) मूली खाने से जुकाम रोग भी नहीं होता है, इसलिये मूली को सलाद के रूप में जरुर खाना चाहि

३) हर रोज मूली के उपर काला नमक डालकर खाने से भूख न लगने की समस्या दूर हो जाती है।

४) मूली खाने से हमें विटामिन 'ए' मिलता है जिससे दाँतों को मजबूती मिलती है।

५) मूली खाने से बाल झड़ने की समस्या दूर हो जाती है।

६) बवासीर रोग में कच्ची मूली या पत्तों की सब्जी बनाकर खाने से फायदा होता है।

७) अगर पेशाब का बनना बंद हो जाये तो मूली का रस पीने से दोबारा बनना आरंभ हो जाता है।

८) हर रोज कच्ची १ मूली सुबह उठते ही खाने से पिलीया रोग में आराम मिलता है।

९) नियमित रूप से मूली खाने से मधुमेह का खतरा भी कम रहता है।

१०) अगर आपको खट्टी ड्कारे आती है तो मूली के एक कप रस में मिश्री मिलकर पिने से फायदा होता है।

११) नियमित रूप से मूली खाने से मूँह, आंत और किडनी की कैंसर का खतरा कम रहता है।

१२) थकान मिटाने और निंद लाने में मूली सहायक है।

१३) मोटापा दूर करने के लिये मूली के रस में निम्बू और नमक मिलाकर सेवन करे।

१४) पायरिया से परेशान लोग मुली के रस से दिन में २-३ बार कुल्ले करें व रस पिये, फायदा होगा!

१५) सुबह, शाम मूली का रस पिनेसे पुराने कब्ज में भी लाभ होता है।

१६) मूली के रस में समान मात्रा में अनार का रस मिलाकर पिने से हिमोग्लोबिन बढ़ता है।

१७) मूली को धीरे-धीरे चबाकर खाने से दाँत चमकते है, और शरीर के दाग-धब्बे भी दूर हो जाते है।

१८) मूली खाने से हमारी आँखों की रोशनी बढ़ती है।

१९) मूली नियमित खाने से ब्लड प्रेशर कंट्रोल में रहता है।

२०) मूली खाने से पेट में गॅस की तकलीफ नहीं होती है।

२१) हाथ पैरों के नाखुनों का रंग सफेद होता है। रस पिना लाभदायक होता है।

२२) सुबह सुबह मूली के नरम पत्तों पर सेंधा नमक लगाकर खाने से मूँह की दुर्गंध दूर होती है।

२३) इसके पत्तों में सोडियम होता है, जो शरीर में नमक की कमी को दूर करता है।

२४) नियमित मूली खाने से पेट के किडे दूर हो जाते है।

२५) मूली का रस स्वास्थ्य के किये बहुत फायदेमंद है।

**श्रीकृष्ण आंबेकर, बडोदा**

९४७९७ ८९४५५

# मला उमजलेले संरक्षणमंत्री

डॉ. योगेश गुर्जर, पुणे
मो. ९८२२३ ००२४४

दि. १० ऑगस्ट २०१६ ला मी लंडनहून परत आलो. खरं म्हणजे घाईने यायचे काहीच कारण नव्हते. मानिनी माझी पत्नी १६ ऑगस्टला येणार होती, मी पण तेव्हाच आलो असतो तर काही बिघडणार नव्हते. पण परमेश्वराच्या मनात काही तरी वेगळी योजना असावी, म्हणूनच मी १०ला परत आलो. १२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ४ च्या सुमारास मित्राचा फोन आला की, भारताचे संरक्षणमंत्री तुझ्याकडे येऊ इच्छितात आणि अमुक अमुक नंबरवर लगेच फोन कर. प्रथम विश्वासच बसला नाही. त्याला मी म्हणालो, 'अरे, मी तर त्यांना ओळखत पण नाही; बहुधा Mistake Identity चा प्रकार असावा.' 'तो मी नव्हेच!' त्यावर तो म्हणाला की, जास्त न बोलता लगेच फोन कर. त्याने दिलेल्या नंबरवर फोन केल्यावर संरक्षण मंत्र्यांच्या सचिवाने सांगितले की, साहेब म्हणजे श्री. मनोहरजी पर्रीकर १४ ऑगस्टला सकाळी आपल्याकडे येऊ इच्छितात. तेव्हा आपली वेळ confirm करावी. खरं म्हणजे मी वेळ नक्की करण्याचा प्रश्नच नव्हता. कारण एवढी महत्त्वाची व्यक्ती भारताचे संरक्षणमंत्री व मोदी मंत्रिमंडळातील कोहिनूर हिराच माझ्याकडे येणार होता. आता विचार करायला पण फार वेळ नव्हता, फक्त ४२ तास! count down तिथेच सुरू झाला. अक्षरशः पुढच्या तासात पोलीस आले. त्यांची search party आली. Factory पिंजून काढली. माझ्यासह स्टाफ व कामगारांची चौकशी झाली. इतकेच काय, समोरच्या Factory मधल्या लोकांचीही चौकशी झाली. दि. १३ ला वरिष्ठ पोलीस अधिकारी येऊन Protocol समजावून गेले. कोणताही बाहेरचा पदार्थ आणू नये, अशी ताकीदही दिली. मानिनी पण इथे नाही, मग बहिणीने रव्याचे लाडू केले.

दि. १४ ला सकाळी ६ वाजताच फॅक्टरीत हजर झालो. ७ वाजता स्फोटके शोधणारी टीम आली. ८ वाजता बॉंब शोधणारी टीम आली, तर ९ वाजता डॉग स्कॉड आले. अत्यंत चोख अशी सुरक्षाव्यवस्था होती. ९ वा. एक पोलीस अधिकारी आले व त्यांनी 'काय खायला देणार आहात?' असा प्रश्न विचारला त्यांना रव्याचे लाडू दाखविल्यावर त्यातला एक लाडू त्यांनी खाल्ला. हे बघून भयंकर टेन्शन आले. किती महत्त्वाची व्यक्ती आपल्याकडे येत आहे याचे भान आले.

राजकीय व्यक्ती म्हटले की, साधारण २ तास तरी उशिरा येतात आणि इथेच मला मोठा धक्का बसला. ९ वाजून ५९ मिनिटांनी एक पोलीस व्हॅन आत आली अणि माझ्या



पोर्चमध्ये येऊन उभी राहिली. स्वतःच दार उघडून एक अत्यंत साधी व्यक्ती- म्हणजेच मनोहर पर्रीकर बाहेर पडले व झपाझप पावले टाकत कॉन्फरन्स रूममध्ये दाखल झाले. त्यांच्या साधेपणाच्या गोष्टी वृत्तपत्रातून वाचल्या होत्या, त्या प्रत्यक्ष अनुभवत होतो. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना बोलावून मला एवढी सीक्युरिटी नको, एक पोलीस गाडी ठेवून बाकी सर्व परत पाठवा, असा आदेश दिला.

त्यानंतर आम्ही सगळेच एका मंतरलेल्या विश्वात गेलो. त्यांच्या बरोबर खरं म्हणजे ७-८ लोक होते, पण पुढचे २ तास आम्ही दोघेच बोलत होतो आणि तेही फक्त टेक्निकल विषयावर. ते स्वतः पवईचे बी.टेक. असल्याने चर्चा फक्त टेक्निकल विषयावरच झाली. भारताच्या संरक्षणमंत्र्यांच्या माहितीचा आवाका बघून मी आश्चर्यचकित झालो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे १२५ कोटी लोकांपैकी मी एक पिरंगुटसारख्या खेडेगावात असलेला एक छोटासा कारखानदार आणि अशा व्यक्तीला भारताचा संरक्षणमंत्री २ तास देतो. खरोखरच महान व्यक्तिनेच हे करणे शक्य आहे.

अनेक गोष्टींवर चर्चा झाली. 'संरक्षणदलासाठी तुम्ही काय करू शकाल?' यावरही बरीच चर्चा झाली. काही Specific Project वर पण चर्चा झाली आणि अचानक त्यांनी Video Shooting बंद करायला सांगितले. त्यांचा स्वतःचा फोन नं. मला दिला व एक प्रोजेक्टवर काम करावयास सांगितले. त्यासंबंधी कळवा; कुठलीही टेक्निकल चर्चा फोनवर किंवा मेलवर करू नका हे सांगायलासुद्धा ते विसरले नाहीत. फोन नं. भेटीची वेळ घेण्यासाठी वापरा. तुम्हाला भेटीची वेळ १ तासात मिळेल व प्रोजेक्टबद्दल काही बोलायचे असल्यास वन-टू-वन बोलायचे आणि तेसुद्धा साऊथ एक्सटेन्शनच्या बागेत, ऑफिसमध्ये नाही हे सांगायलाही ते विसरले नाहीत.

या भेटीनंतर दोनदा त्यांची भेट झाली आणि अचानक एक दिवस त्यांनी संरक्षण मंत्रिपदाचा राजीनामा दिल्याचे समजले व ते गोव्याला परतले. देश खरंच एका द्रष्ट्या, हुशार आणि तरीही अत्यंत साध्या संरक्षणमंत्र्याला मुकला. ते खरंच कोहिनूर हिरा होते. एक दिवस अचानक त्यांच्या



मित्राचा फोन आला आणि नको ती बातमी समजली. जो माणूस सगळ्यांना हवा असतो, तो देवाला पण हवा असतो. दीड वर्षाच्या कठीण काळात अत्यंत आजारी असूनसुद्धा लोकोपयोगी कामे त्यांनी केली. हॉस्पिटलमधून ते कोठेही त्यांच्या शरीरातील नळ्यांसकट जात होते. अखेर त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांची माझ्या कारखान्याला भेट ही माझ्या आयुष्यातली अत्यंत महत्त्वाची घटना होती. असा संरक्षणमंत्री होणे नाही. भावपूर्ण त्यांना श्रद्धांजली.

# एक तपस्वी श्री. अनंत दत्तात्रेय कात्रे

डॉ. शैलजा कात्रे, पुणे
मो. : ९७६७९ ६२८७८

**जन्म :** २१ सप्टेंबर १९१८, भाद्रपद कृष्ण प्रतिपदा

**ठिकाण :** शेळोली, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

**शालेय शिक्षण :** इयत्ता ३ री पर्यंत, १९२३ ते १९२६

**उपनयनसंस्कार :** वैशाख महिना, १९२६

**घरी वडिलांकडे वेदाध्ययन :** १९२६ ते १९३४

**अध्ययनासाठी संकेश्वरला प्रयाण :** मे १९३४.

**संकेश्वर वास्तव्य :** १९३४ ते १९४३. या कालावधीत जगद्गुरू शंकराचार्यमठात सकाळी वेद व सायंकाळी शास्त्र याप्रमाणे ऋग्वेद संहिता व शाखाध्ययन वे. मू. अहिताग्नी गणेशभट्ट बाक्रे यांचेकडे आणि सिद्धांतकौमुदी, काव्य, न्याय, मीमांसा यांचे शिक्षण श्रीपादशास्त्री जेरे यांचेकडे केले. याच कालावधीत १९३९-४० या दोन वर्षांत जगद्गुरू शंकराचार्य यांच्या धर्मप्रसारासाठीच्या संचारात व दोन चातुर्मासात अमरावती व नागपूर येथे सहप्रवास व सहवास. याच कालावधीत त्यांच्याबरोबर १९४० मध्ये काशीयात्रा घडली.

**कोल्हापूर येथील वास्तव्य :** १९४३ मध्ये संकेश्वर येथील पाठशाळा बंद झाल्यावर १९४४ साली घरी परत. त्यानंतर ६ महिने सांगली येथे व नंतर श्रीपादशास्त्री जेरे कोल्हापूरला आल्याने १९४५ पासून १९५३ पर्यंत कोल्हापूर येथे वास्तव्य. या कालावधीत काव्यतीर्थ व न्याय, मीमांसा यांच्या परीक्षा दिल्या.

**विवाह :** २६ जानेवारी १९५३. केरी, गोवा येथील चंद्रभागा देसाई यांच्याशी विवाह. विवाहानंतर नाव सौ. पद्मजा.

**इचलकरंजी वास्तव्य :** १९५४ ते ऑ. १९७९. १९५४ मध्ये गोविंदराव हायस्कूल येथे संस्कृत शिक्षक म्हणून रुजू. निवृत्त : १९७६. या कालावधीत १९६४ ते १९७९ अशी १४ वर्षे समाज शिक्षण मंडळ यांच्यातर्फे श्री. दि. रा. कबनूरकर यांच्या



विशेष प्रयत्नाने सुरू झालेल्या संस्कृत पाठशाळेत सायंकाळी ६ ते ८ शिकवणे. येथे काव्यतीर्थपर्यंतच्या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली. श्री. वि. ना. पोखरणकर यांचे मदतीने संस्कृत वाग्विहारमाला हे नियतकालिक चालवले.

**पुणे वास्तव्य :** दि. १५ ऑगस्ट १९७९ पासून. पुण्यात आल्यावर १९८५ ते २००७ या कालावधीत पटवर्धन पाठशाळेत संस्कृत शिकवणे व अग्निहोत्रास मार्गदर्शन व सहकार्य. २००७ नंतर घरी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन. विशेषत: टि. म. वि. च्या एम. ए. परीक्षेसाठी श्री. किशोर जोशी यांना तसेच वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या याज्ञिक चुडामणी या परीक्षेसाठी श्री. वझे, श्री. किशोर जोशी व श्री. दत्तात्रेय जोशी यांना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन. श्रौत यागांसाठी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.

संकेश्वर येथे आहि. गणेशभट्ट बाक्रे, इचलकरंजी येथे आहि. रघुनाथ भि. गुळवणी, कोल्हापूर येथे आहि. वठारकर व पुण्यात आहि. राजाराम कुलकर्णी यांचेबरोबर अग्निहोत्र इष्टिमध्ये सहभाग. विशेषत: आहि. कुलकर्णी यांचेबरोबर विविध ठिकाणी नक्षत्रेष्टि, चातुर्मास्य याग, काम्येष्टि यात सहभाग व मार्गदर्शन.

**अग्निहोत्रासंबंधीच्या कार्याच्या अनुषंगाने विविध संस्थांकडून वेळोवेळी सत्कार केले गेले. ते असे :**

**२००२ :** श्रीमद् जगद्गुरू शंकराचार्य मठ **करवीर पीठ, कोल्हापूर येथे –** वे. शा. सं. श्रीपादशास्त्री जेरे सांस्कृतिक पुरस्कार.

**२००४ :** श्रीगुरूदरबार सेवा मंडळ, बेळगाव.

**२००७ :** वैदिक संमेलन, अहमदनगर, शृंगेरी शंकराचार्य यांचे हस्ते.

**२००७ :** वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणे.

**२००८ :** श्री क्षेत्र आळंदी ब्रह्मवृंद अनुष्ठान मंडळ.

**२००९ :** श्री दुर्गोपासक ऐक्यवर्धक संघ, वागदे.

**२००९ :** शारदा ज्ञानपीठ व पुणे महानगरपालिका यांचेतर्फे ऋषिपंचमी निमित्त.

**२०१५ :** श्रीपाद सेवा मंडळ, श्रीसंत मामासाहेब देशपांडे आश्रम, पुणे.
वासुदेवानंद सरस्वती टेंब्येस्वामी महाराज स्मृति 'वेदमूर्ती' पुरस्कार
मा. श्री. शिरीष कवडे, अध्यक्ष यांचे हस्ते.

**'वंदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामृतो वाचः**
**करणं परोपकरणं येषां केषां न ते वन्द्याः।'**

इयत्ता नववीमध्ये शिकलेले हे सुभाषित प्रत्यक्षात अनुभवले ते १९८२च्या जूननंतर. कात्रे कुटुंबातील श्री. शशिकांत यांच्याशी माझा विवाह झाला आणि मी छायाची शैलजा झाले. माझे हे नामकरण माझ्या सासरेबुवांनी केले. सुरुवातीपासूनच त्यांनी मला याच नावाने हाक मारावयास प्रारंभ केला. मीही या नवीन नावानिशी कात्रे कुलात सहजच सामावून गेले. यात मला



सर्वांत मोठी मदत झाली ती ती. तात्यांच्या मोकळ्या स्वभावाची.

ती. तात्या संस्कृतचे शिक्षक व माझाही अभ्यासविषय संस्कृतच. त्यामुळे आमच्या नात्याला एक विशेष झालर प्राप्त झाली. घरातील रीतिरिवाज, त्यामागील धर्मतत्त्व याविषयी ते मला उत्तम रीतीने सांगत असत. त्यामुळे माझ्या मनाची धार्मिक बैठक दृढ होण्यास खूप मदत झाली. ती. तात्यांच्या मार्मिक विवेचनामुळे बुद्धिजीवी तरीही श्रद्धाळू असलेल्या मलाही कात्रे घरातील थोड्याशा कर्मठ वातावरणात वावरणे सुलभ झाले.

ती. तात्यांना पाहिल्यानंतर प्रथम जे नजरेत भरले ते त्यांचे तेजस्वी व करारी डोळे. त्या डोळ्यांत विद्वत्ता होती. वेष, कोट, सदरा-धोतर व टोपी असा. म्हणजे आमच्या आजोबांसारखाच भारदस्त. प्रथमतः त्यांच्याबद्दल वाटणारी भीती त्यांच्याशी संभाषण करू लागल्यावर आपोआप नाहीशी झाली व वर्षभरातच मी त्यांच्याशी चांगलाच संवाद साधू लागले. त्यांनीही त्यांच्या आयुष्यातील अनेक गोष्टी अगदी सविस्तरपणे मला सांगितल्या. त्यांच्या या मोकळेपणामुळे मीही त्यांच्यामध्ये माझ्या वडिलांना पाहू लागले. माझ्या वडिलांचे १९८६ मध्ये आकस्मिक निधन झाल्यानंतर तर मी वारंवार त्यांच्यामध्ये 'माझे बाबा' शोधू लागले आणि मला ते वेळोवेळी सापडलेही.

ती. तात्यांकडे येणाऱ्या विविध प्रकारच्या माणसांशी ते कसे वागतात, बोलतात, हे मी अनेकदा पाहिले आहे. व्यवहार कसा करावा याचा वस्तुपाठच ते जणू देतात, असे वाटते. संतश्रेष्ठ रामदासस्वामींचा दासबोध त्यांनी नुसता वाचला नाही तर त्याप्रमाणे त्यांचे आचरण आहे, असेच मला अनेकदा वाटते. 'प्रपंच करावा नेटका' हे त्यांनी प्रत्यक्षात आणले आहे. प्राप्त परिस्थितीत कोणतीही तक्रार न करता सावधपणे उत्तमरीत्या कसे राहावे यासाठीचा त्यांचा वस्तुपाठ सर्वांनीच लक्षात घेण्यासारखा आहे. त्यांनी हे 'असिधाराव्रत' अखंडपणे चालवले आहे.

'मला वेदान्ततत्त्वज्ञानाची फारशी आवड नाही, मी कर्मकांड मानणारा साधा माणूस आहे' असे सर्वांना सांगणारे ती. तात्या खरे स्थितप्रज्ञ आहेत व ब्रह्मतत्त्व जाणणारे आहेत याची प्रचिती अनेकदा आली आहे. माझ्या दिरांच्या म्हणजेच त्यांच्या पुत्राच्या- श्री. उमाकांतच्या निधनाची बातमी रात्री त्यांना सांगितली तेव्हा त्यांचे स्तब्ध होणे, नंतर धर्मसिंधु ग्रंथ काढून त्याचे वाचन करून आम्हाला सांगणे या सर्व वर्तनावरून त्यांच्या स्थितप्रज्ञतेची कसोटीच परमेश्वर पाहतो आहे, असे वाटत होते. कुटुंबातील अनेक प्रसंग त्यांच्या अशा प्रकारच्या धीरोदात्त व खंबीर स्वभावाची साक्ष देतात.

आपल्या वर्तनाने दुसऱ्यांना त्रास होऊ नये याची खबरदारी ते आज वयाच्या शंभराव्या वर्षीही घेतात. तसेच घरातील कामात मदत करावयाची त्यांची केव्हाही तयारी असते श्रौतकर्मातील काही किचकट गोष्टी शास्त्राधार देऊन शिकविणारे, रघुवंश मल्लिनाथीसह समजावणारे व कौमुदीतील सूत्रे सांगून एखाद्या रूपाची सिद्धता सहजतेने सांगणारे आमचे तात्या आजही मी आणलेली पालेभाजी निवडण्यास तितक्याच हिरीरीने पुढे येतात किंवा त्यांच्या पणतूला मांडीवर घेऊन झोपविण्यासही तयार असतात. सुना, जावई, नातवंडे, नातसून यांच्याशी अत्यंत मोकळेपणाने बोलतात. आपले अनुभव सांगतात, पण 'असेच करावे' असा कोणताही दुराग्रह न बाळगता प्रेमाने समजावतात. त्यामुळेच सर्वांच्या मनात त्यांच्याबद्दल आपसूकच प्रेम, जिव्हाळा उत्पन्न होतो.

त्यांनी शाळेत अनेक विद्यार्थी घडविले, प्रपंचात अनेक नातेवाईक जोडले. व्यवहारात अनेक हितसंबंध जपले, अनेकांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. इतके करूनही अहंभाव त्यांना शिवलासुद्धा नाही आणि हेच त्यांच्या शतायुष्याचे खरे रहस्य आहे. लहानपणी झालेले उत्तम संस्कार, शरीरावर केलेले व्यायामसंस्कार व कष्टाचरण, निरलसपणे केलेले विद्यादान वेदाध्ययन व वेदविहित आचरण याद्वारा त्यांचा आजपर्यंतचा प्रवास झाला आहे.

कात्रे कुटुंबातील हा खरा 'चालता-बोलता खजिनाच' आहे. हा खजिना सांभाळण्याची शक्ती परमेश्वराने आम्हास द्यावी ही ईशचरणी प्रार्थना.



वयाची शतकपूर्ती निमित्ताने श्री. कात्रे यांच्या निवासी स्थानी जाऊन कऱ्हाडे महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर तसेच अन्य संघाचे पदाधिकारी यांनी भेट घेतली.

nakhye
UDYOG

AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
SWEETS

ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.

M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - **2482106, 2483476**
• Everest Pride, Kelkar Road, Dombivli (E). Mob.: **86918 99000** • Everest House, Pandit Deendayal Road. Dombivli (W). Mob.: **97026 55000.**
• Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk, Phadke Road, Dombivli (E). Tel: **2433193.** Mob.: **97028 11122.**

Shubhmangal
CATERERS & AC HALL

Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) **0251 - 2860720, 9702666000**, Fax: **2483351.**
Email: ynakhye@gmail.com
Website: **www.shubhamangalhall.com**

EVEREST
HALL

AN AIR CONDITIONED HALL
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES

M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: **9702622000, 9702011131**

EVEREST
DISTRIBUTORS

**DISTRIBUTORS FOR**
**Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico), Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy**

Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: **+91 251- 2483476, 2482106.**
Fax: **+91 251- 2483351.** Email: **anakhye@gmail.com**

finVantage

EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO,
Mutual Fund, Realty, Life and General Insurance,
PMS and Financial Planning Advisory

M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: **91251 2480305**

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

WE LOVE
WHAT WE DO.

VJ | VILAS JAVDEKAR
DEVELOPERS

www.javdekars.com

Corporate Office: 306, Siddharth Towers, Sangam Press Road,
Kothrud, Pune 411038. | T: +91-20-6764 8000

BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषक:
संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३० फोन : ०२० २४४३ २४४३.

To,
श्री खानवलकर सुहास गंगाधर
बी ३, वृंदावन, महात्मा सोसायटी
जवळ, कोथरूड, पुणे ४११०३८

